१०२
शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, रविवार १० नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-५४, पाने-८, किंमत : ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 54, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 10 November, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

वडिलांनी फ्लॅट घेतला, मी स्वतंत्र राहिलो

नवी दिल्ली - माझ्या वडीलांनी पुण्यात एक घर घेतले आणि आता तुझ्या डोक्यावर छत आहे. त्यामुळे कधीही तडजोड करु नको असे त्यांनी मला सांगितले. नुकतेच निवृत्त झालेले सुप्रीम कोर्टचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी ही आठवण सांगितली.

शिंदे गट अपात्र ठरला तरी नवीन सरकारवर परिणाम नाही!

आमदार अपात्र सुनावणीचा दिरंगाईमुळे बट्ट्याबोळ

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर पक्ष चिन्ह आणि पक्षाचे नाव शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने फेब्रुवारी २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकेवर आता नवे सरकार स्थापन झाल्यावर डिसेंबर महिन्यात सुनावणी होणार असल्याने शिंदे गट अपात्र ठरला तरी सरकारवर त्याचा परिणाम होणार नाही. सुनावणीत दिरंगाई झाल्याने या खटल्याचा बट्ट्याबोळ झाला आहे.

■ मुंबई

ही याचिका फेब्रुवारी २०२३ पासून प्रलंबित आहे. दीड वर्षे सुनावणीच्या तारखेवर तारखा पडत गेल्या. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू असलेल्या या याचिकेवर निदान ८ नोव्हेंबर रोजी तरी सुनावणी होईल अशी अपेक्षा होती. कारण ८ नोव्हेंबर न्या. चंद्रचूड यांचा कामकाजाचा शेवटचा दिवस होता. दीड वर्ष रखडलेली ही याचिका आपल्या कामकाजाच्या शेवटच्या दिवशी तरी सरन्यायाधीश निकाली काढतील, अशी अपेक्षा होती. मात्र ती फोल ठरली. याचिकेवर आता १० डिसेंबर रोजी म्हणजेच

राज्यात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर सुनावणी होणार आहे. नंतर निकाल लागला तर नव्या सरकारवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. निकाल हा पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाही. त्यामुळे नवीन सरकारमधील शिंदे गट बेकायदा ठरला तरी सरकारवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. सरकारमध्ये आमदार, मंत्री कायम राहतात. त्यामुळे हा निकाल ही केवळ औपचारिकता राहिली आहे, असे सर्वोच्च न्यायालयातील जाणकार वकिलांनी सांगितले.

शिवसेनेत फूट पडल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि पक्ष चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले. तर आमदार अपात्र प्रकरणी निकाल देण्याची जबाबदारी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्यावर सोपवली. नार्वेकर यांनी उद्धव ठाकरे गट आणि शिंदे गट यापैकी कोणाचेही आमदार अपात्र ठरविले नाहीत. त्यानंतर ठाकरे गटाने आयोगाने दिलेल्या पक्ष नाव आणि चिन्ह याबाबत दिलेला निर्णय आणि नार्वेकरांनी दिलेला आमदार अपात्रतेवरील निर्णय अशा दोन्ही निर्णयांना दोन स्वतंत्र याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. आयोगाच्या निकाला विरोधात ठाकरे गटाने फेब्रुवारी २०२३ मध्ये याचिका दाखल केली. याचिकेवरील सुनावणीसाठी न्यायालयाने सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ निश्चित केले. याचिकेवर अनेकदा सुनावणी झाली. त्यामध्ये बरेच महिने खर्च पडले. ठाकरे गटाने सुनावणी वेगाने व्हावी अशी विनंती वारंवार केली. पण सरन्यायाधीशांनी त्याकडे दुर्लक्ष केले. याचिकेवर शेवटची सुनावणी ऑगस्ट २०२३ मध्ये झाली. त्यानंतर मागील सुमारे चौदा महिने

» पान २ वर

थोडक्यात...

हिंगोलीत सुभाष वानखेडेंची ठाकरे गटातून हकालपट्टी

हिंगोली - हिंगोलीचे माजी खासदार सुभाष वानखेडे यांची ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीत ते विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज भरण्यासाठी त्याच्याबरोबर गेले आणि त्यांचा प्रचारही करीत असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. त्यामुळे पक्षाचे सचिव विनायक राऊत यांनी ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ही कारवाई केली. ठाकरे गटाच्या मध्यवर्ती कार्यालयातून यासंदर्भात माहिती दिली. यासंदर्भात सुभाष वानखेडे यांना कळवले असल्याचे ठाकरे गटाकडून सांगितले.

सिंधुदुर्गात मतदानादिवशी सर्व आठवडी बाजार बंद

सिंधुदुर्ग - विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील कणकवली, कुडाळ व सावंतवाडी मतदारसंघांत २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यामुळे त्या दिवशी जिल्ह्यातील ज्या ज्या ठिकाणी आठवडी बाजार भरविण्यात येतो त्या ठिकाणी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, मतदान सुरळीतपणे पार पडावे, याकरिता कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने मतदानादिवशी भरविण्यात येणारा आठवडी बाजार बंद ठेवण्यात येणार आहे. मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी अनिल पाटील यांनी दिले आहेत.

केसरकरांनी संपत्ती वाढवली ठाकरे गट प्रवक्त्यांचा टोला

सावंतवाडी - महायुतीचे उमेदवार दीपक केसरकर यांची २००९ मध्ये असलेली मालमत्ता पंधरा वर्षात १२५ कोटी रुपये झाली. त्यासाठी त्यांनी केलेल्या उद्योगधंद्याचे मार्गदर्शन त्यांनी बेरोजगार तरुणांना द्यावे असा टोला उबाठाचे प्रवक्ते डॉ. जयेंद्र परुळेकर यांनी आज लगावला. निवडणुका आल्या की केसरकर न केलेल्या कामांचा पाढा वाचतात. ते रेटून खोटे बोलतात. त्यांना खोटे बोलण्यासाठीचा एखादा पुरस्कारच दिला पाहिजे. त्यांनी केवळ आपली संपत्तीच वाढवली, असाही आरोप त्यांनी केला.

आ. प्रशांत बंब यांच्या सभेमध्ये पुन्हा गोंधळ

छत्रपती संभाजीनगर - भाजपाचे विद्यमान आमदार प्रशांत बंब यांच्या सभेत पुन्हा एकदा गोंधळ उडाला होता. गवळी शिवारा गावात दोन तरुणांनी आमदार प्रशांत बंब यांना रेल्वे संदर्भात दिलेल्या आश्वासनावरुन प्रश्न विचारले. त्यावरून संतप्त झालेल्या प्रशांत बंब यांनी तरुणांना शांत बसण्यास सांगितले. मात्र तरीही तरुणांनी १५ वर्षे झाली काय केले, असे विचारले. त्यावर बंब यांनी नाही पटले तर मत नको देऊ असे सांगितले. त्यानंतरही तरुण जाब विचारत राहिले. यावेळी आमदार बंब यांनी तरुणांना धमकावण्याचा प्रयत्न केला. बंब म्हणाले की, मी इथे नसतो, तर तू पस्तावशील इतके हे लोक तुझी हालत खराब करतील. मरेपर्यंत पस्तावशील. बस झाले, यांना आता मागे घ्या. त्यानंतर बंब यांच्या कार्यकर्त्यांनी त्या तरुणांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

॥ संतांना वंदन ॥
परंपरेचं जतन

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग
संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग

- महानुभाव तीर्थक्षेत्र विकास : रिद्धपूर, काटोल, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, नांदेड, पांचाळेश्वर, पैठण या चक्रधर आणि महानुभाव पंथ संबंधित क्षेत्रांचा विकास
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने झालेल्या स्वातंत्र्यलढ्याचे स्मारक
- जेजुरीगड, भीमाशंकर, नीरा-नरसिंगपूर, श्रीक्षेत्र परळी इ. क्षेत्रविकास
- संत जगनाडे महाराज समाधीस्थळ सुदुंबरे विकास, नागपुरात आर्ट गॅलरी
- श्री संत सेवालाल महाराज स्मारक, नगाराभवन, पोहरादेवी
- संत निवृत्तीनाथ महाराज समाधीस्थळ विकास
- संत निळोबाराय महाराज समाधी मंदिर विकास
- संत गाडगेबाबा समाधीस्थळ विकास, ऋणमोचन
- प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज स्मारक निधी
- गहिनीनाथ गड संवर्धन व विकास
- संत मुक्ताई मंदिर कोथळी विकास

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

भाजप-महायुती आहे तर गती आहे
महाराष्ट्राची प्रगती आहे

शिवसेना

भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र
Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

महाराष्ट्राला कुणाचे एटीएम बनू देऊ नका

अकोल्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आवाहन

■ अकोला

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रात प्रचारासाठी आले. त्यांनी अकोल्यातील प्रचार सभेत पुन्हा एकदा काँग्रेसवरच टीकेचा भडिमार केला. गांधी परिवाराचा उल्लेख शाही परिवार असा करत मोदी म्हणाले की, ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता येते ते राज्य शाही परिवाराला वाट्टेल तेव्हा पैसे देणारे एटीएम मशीन बनते. महाराष्ट्राला शाही परिवाराचे एटीएम बनू देऊ नका.

विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारातील मोदींची विदर्भातील ही पहिलीच सभा होती.

ते पुढे म्हणाले की काँग्रेसची सत्ता असलेली हिमाचल प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा ही राज्ये सध्या भाजपाची एटीएम बनली आहेत.शाही परिवारासाठी या राज्यांमधून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात आहे.महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसने तेलंगणा आणि कर्नाटकमधील मद्य व्यावसायिकांकडून ७०० कोटींची वसुली केली आहे. देश स्वतंत्र झाल्यापासून काँग्रेसने

» पान २ वर

भाजपाच्या जाहिराती धादांत खोट्या

काँग्रेसचे मुख्यमंत्री मुंबईत! भाजपाला प्रत्युत्तर

■ मुंबई

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपाने केलेल्या, काँग्रेसने कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशात जाहीर केलेल्या गॅरंटी दिल्या नाहीत, या आरोपाला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने आज या राज्यांच्या मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना मैदानात उतरवले. भाजपाच्या आरोपांची चिरफाड करण्यासाठी काँग्रेसकडून

मुंबईत पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यात हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी देशाचे पंतप्रधान मोदी आणि भाजपाच्या नेत्यांवर खोटारडेपणाचा आरोप केला. आपल्या राज्यात या गॅरंटी कशा लागू केल्या व त्याचा किती लोकांना लाभ झाला, याची त्यांनी आकडेवारीसह सविस्तर माहिती दिली.

काँग्रेसचे मुख्यालय असलेल्या

» पान २ वर

मोदी अदानीला देतात मी त्यांच्याकडून घेतो

या पत्रकार परिषदेत तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांना उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत सामील आहेत. त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात धारावीतील अदानी प्रकल्पाला विरोध केला आहे. दुसरीकडे अदानीचे प्रकल्प तेलंगणात होत आहेत. ते तेलंगणात कोट्यवधींची गुंतवणूक करत आहेत. याचा समतोल तुम्ही कसा साधणार, असा प्रश्न विचारण्यात आला. त्याला उत्तर देताना रेवंत रेड्डी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी सगळे पैसे अदानीला देत आहेत. मी अदानीकडून घेतो आहे.

भाजपा उद्योग आघाडी अध्यक्ष खाडे यांची सांगलीत हत्या

आरोपीला अटक

■ सांगली

भाजपा उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर खाडे (५२) यांची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या झाली. जमीन विकासक म्हणून व्यवसाय करणारे खाडे आज सकाळी मिरज-पंढरपूर रस्त्यावर एका वादग्रस्त जमिनीत कुंपण घालण्यासाठी गेले असता हा प्रकार घडला. ऐन विधानसभा निवडणूक काळात घडलेल्या या हत्येने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी कार्तिक चंदनवालेला ताब्यात घेतले. पंढरपूर रस्त्यावरील पावणेचार एकर न्यायप्रविष्ट जमीन खाडे यांनी विकासासाठी घेतली होती. या जागेवर कुंपण घालण्यासाठी ते काही साथीदारांसोबत संबंधित शेत जमिनीमध्ये गेले होते. यावेळी शेतजमिनीचे कब्जेधारक आणि सुधाकर खाडे यांच्यात जोरदार वादावादी झाली. आरोपीने कुऱ्हाडीने सुधाकर खाडे यांच्या मानेवर हल्ला केला. हल्ल्यानंतर त्यांना तातडीने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु, त्यांचा मृत्यू झाला.

मुंबई-पुणे महामार्गावर अपघातात २६ जण जखमी! ५ जण गंभीर

■ मुंबई

मुंबई-पुणे महामार्गावर कोल्हापूरवरुन मुंबईकडे येणारी खासगी बस आणि ट्रकचा अपघात झाला. हा अपघात खोपोलीजवळ पहाटे चार वाजता झाला. बसमध्ये एकूण ३८ प्रवासी होते. या अपघातात २६ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यातील ८ जणांची प्रकृती अतिशय गंभीर आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी दाखल होऊन तात्काळ बसमधील प्रवाशांना बाहेर काढले. जखमी प्रवाशांना उपचारासाठी कामोठे एमजीएम रुग्णालयात तर गंभीर जखमी असलेल्या प्रवाशांना मुंबईतील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

राज्यात मोदी गॅरंटी चालत नाही उद्धव ठाकरे यांचा घणाघात

■ नांदेड

राज्यात आता मोदी गॅरंटी चालत नाही हे सिद्ध झाले आहे. तुम्ही गेल्या १० वर्षात थापांशिवाय जनतेला काहीही दिलेले नाही. ज्यांच्यावर त्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप केले ते त्यांच्याकडे गेले की लगेच साधुसंत होतात, असा घणाघात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ते आज नांदेड जिल्ह्यातील लोहा मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार एकनाथ पवार यांच्या प्रचारसभेत बोलत होते.

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी मोदी शहा यांचा समाचार घेतला. शहा माझ्यावर आरोप करतात की मला माझ्या मुलाला मुख्यमंत्री करायचे आहे. तुमचा मुलगा क्रिकेट मंडळाचा अध्यक्ष आहे. त्याचे काय कर्तृत्व आहे? तुमच्या मनातही पंतप्रधान होण्याची इच्छा नाही हे तुम्ही शपथेवर सांगू शकता का? तुमचा विकास हा केवळ कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी आहे. तुम्ही उड्डाणपुल बांधता पण त्याखाली जर आमचा युवक भीक मागणार असेल तर तो विकास काय कामाचा? मुलींना केवळ महिना पंधराशे रुपये देऊन घरी बसवायचे असेल तर त्याला काय अर्थ आहे? राज्यात आमचे सरकार आल्यानंतर महिलांना ३,००० हजार रुपये देणार आहोत.

१८५७ च्या स्वातंत्र्य समरातील ऐतिहासिक शस्त्रसाठा सापडला

उत्तर प्रदेशच्या शाहजहानपूर येथे एका शेतात मोठा शस्त्रसाठा सापडला आहे. ही शस्त्रे १८५७ साली भारतीय सैनिकांनी ब्रिटीशांच्या विरुध्द केलेल्या उठावादरम्यान वापरली गेली होती, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

■ लखनौ

निगोही पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ढाकिया परवेजपूर नावाच्या खेडेगावात बाबू राम यांच्या शेतात हा शस्त्रसाठा आढळला. बाबू राम शेतात नांगरणी करीत असता जमिनीखाली गाडला गेलेला हा शस्त्रसाठा उकरून वर आला. कुतुहलापोटी बाबू राम

» पान २ वर

जपानमध्ये मुसळधार पाऊस लोकांना सुरक्षितस्थळी हलवले

■ टोकियो

जपानच्या अनेक भागात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन प्रभावित झाले आहे. त्यामुळे हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. जपानच्या हवामान खात्याने येत्या काही दिवसांत पूरस्थिती व दरड कोसळण्याच्या घटना घडतील असा इशारा दिला आहे. आपले जीव वाचवण्यासाठी शक्य ते सर्व काही करण्याचे आदेशही प्रशासनाने दिले आहे. जपानच्या कागोशिमा, ओकिनावा शहरातील कुणीगामी या भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. अमामी भागातील ओकिनावा बेटावर तसेच योरोन शहरातही जोरदार पर्जन्यवृष्टी होणार असल्याचा इशाराही हवामान विभागाने दिला आहे.

पाकिस्तानातील क्वेट्टा रेल्वे स्थानकावरील बॉम्बस्फोटात २४ ठार! ४० जखमी

■ क्वेट्टा

पाकिस्तानच्या उत्तर पश्चिम बलुचिस्तान भागातील क्वेट्टा रेल्वे स्थानकात आज सकाळी झालेल्या बॉम्बस्फोटात २४ जण ठार झाले असून ४० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये १४ सैनिकांचाही समावेश आहे. या स्फोटाची जबाबदारी बलोच लिबरेशन आर्मी या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. हा आत्मघाती हल्ला असून हल्ल्याचे लक्ष्य येथील पाकिस्तानी सैनिक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. जखमींना क्वेट्टाच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे.

क्वेट्टा रेल्वेस्थानकावर आज सकाळी ९ वाजता एका फलाटावर हा स्फोट

झाला, तेव्हा या फलाटावरुन क्वेट्टाहून पेशावरला जाणारी जाफर एक्सप्रेस रवाना होणार होती.

» पान २ वर

छोट्या जाहिराती

संपर्क करा

८४२२८१७४४५/८१०८११६४२३

पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुले / मुली पाहिजेत. (मालाड वेस्ट) - **8450931541** {NC242982}

बिस्लेरी बॉटलच्या डिलीव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्कः- **9892307267/ 7666255660** {NC243065}

हेडलबर्ग दोन कलर प्रिंटिंगसाठी प्रिंटर पाहिजे. जरीमरी, कुर्ला अंधेरी रोड **9821036458** {NC243062}

ठाण्यातील नामवंत कंपनीला स्क्रीन प्रिंटिंगसाठी ३वर्षे अनुभवी प्रिंटर आणि हेल्पर पाहिजे संपर्कः मो.नं. **9821385744.** {NC243056}

प्रिंटींग प्रेसमध्ये हेडलबर्ग मशीनसाठी फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC243058}

नवीन मालवणी हॉटेलसाठी आचारी, वेटर, मांडणीवाला, कटींगवाला, मोरीवाला पाहिजेत. -**7039838002** {NC243048}

विरार स्टेशनजवळ (इमीटेशन ज्वेलरीचे काम) स्टोन लावण्यासाठी मुली/महिला पाहिजेत. (दिवसाचे 290/- - 310/-) **7058886269 / 9820072369** {NC243018}

2 COLOUR, 4 COLOUR HEIDELBERG AUTOPLATE PRINTER, POLAR CUTTING BINDER, HELPER (लॅमिनेशन रोल कटिंग, टेम्पो लोडिंग) 15000 12 hrs वालिव फाटा, वसई पूर्व - **8600755079** {NC243016}

गोरेगांव पूर्वेला पॅकींगसाठी मुले पाहिजेत - **9326464132 / 9321997724** {NC243009}

4 कलर कोमोरी लिथरोन करिता अनुभवी बॉयलर पाहिजेत. अमरग्यान इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे साईप्रसाद ऑफसेट **9870078008** {NC243034}

त्वरित सिक्युरिटी गार्ड पाहिजे. पगार 20000/- (PF, ESIC ची सुविधा) मोबाईल - **8879977253 / 8879977250** {NC243075}

मुंबई, ठाणेमध्ये घरी पेशंट सांभाळण्यासाठी आया, नर्सेस वॉर्डबॉयची गरज आहे. - **9136792832, 8291152695** {NC243076}

वृद्धाश्रमात पेशंट केअरसाठी, स्वयंपाकासाठी (राहून) व सुपरवायझर (लेडीज) अनुभवी लोक पाहिजेत. मो. नं. **8291912166** कर्जत. {NC243079}

स्क्रीन प्रिंटिंग करिता शिकलेले, हेल्पर मुले-मुली हवे आहेत. **7977828080** {NC243111}

पाहिजेत

कॉरुगेशन कॉन्ट्रॅक्टर ऑफसेट प्रिंटर, लॅमिनेशन ऑपरेटर, मार्केटिंग, हेल्पर्स उल्हासनगरसाठी पाहिजेत. **9323258222** {NC243094}

भिवंडी ठाणे येथील नामांकित प्रिंटिंग प्रेससाठी हेडलबर्ग 72V प्रिंटिंग मशीन फिल्डरमॅन व बॉयलर सिलेंडर फॉइलिंग मशीनसाठी ऑपरेटर सिलेंडर पंचिंग मशिनसाठी ऑपरेटर कळवा रेल्वे स्टेशन पासून जाण्या येण्यासाठी सोय. संपर्क - **8766408439** {NC243107}

पुणे इथे हेडलबर्ग 28x40, 4 कलर व 2 कलर प्रिंटिंग मशीनवर बॉलर, फिडरमॅन, पाहिजेत. पुणे शिवाजी नगर **9822352233** {NC243106}

मालाड म्हातारी बाईला बघून थोडा घरकाम करणारी बाई पाहिजे. दिवसात 10 तास 24000/- नाईट 18000/- (24 तास 24000/- ते 28000/-) **9004682509** {NC243101}

गोरेगाव मध्ये फिमेल ऑफिस असिस्टंट पाहिजे **8055772679 / 9320176123** {NC2423002}

- पाहिजेत -

प्रिंटींग प्रेसमध्ये

फाय कलर हेडेलबर्ग

(SM 74-Size 20 x 28) अनुभवी

प्रिंटर, फिडरमन, बॉयलर व

(Heidelberg Stahl Folding Machine Electronic Model Size 25" x 36")

फोल्डींग मशीन ऑपरेटर पाहिजेत.

पत्ता : बालाजी आर्ट

Unit No 16, विशाल इंडस्ट्रीयल इस्टेट, सीएट टायर समोर, नाहुर स्टेशन जवळ, नाहुर (वेस्ट), मुंबई - 78.

संपर्क : 9820016709

रिसेप्शनीस्ट, अकाऊंटंट, बाइंडर, हेल्पर, पंचींग ऑपरेटर, बॉयलर, फिडरमन पाहिजेत. संपर्क- **9870199683** {NC243064}

माऊथ फ्रेशनर (FMCG) कंपनीत मुंबईमध्ये मार्केटींगसाठी सेल्समेन पाहिजेत. अनुभवी-बिनअनुभवी. (पगार 15,000/- ते 25,000/-) संपर्क कराः **9372465089** {NC243055}

3D Offset 4 Col Komori Auto Plate प्रिंटर, बॉयलर, फिडरमॅन, Helper, Supervisor पाहिजे. मो.: **8591709239** खोपट, ठाणे. {NC243017}

मोठ्या प्रमाणात सिक्युरिटी गार्ड, हाऊसकिपिंग/सुपरवायझर, केअरटेकर, कुक पाहिजे. **9619115448** {NC243110}

पाहिजेत

सुकुटुंबात 24 तास घरकामासाठी (वय 18-30) मुली/बायका पाहिजेत. पगार 15000/- पनवेल **09867104691** {NC243111}

महिला मुली मदतनीस काऊंटरवर कॅशियर्स सुपरवायझर्स कार ड्रायव्हर्स दोन पाळ्यात 15000 - 25000 **8657438844 / 9076103969** {NC243113}

LED लाईट्स आणि सोलार प्रोजेक्टसाठी अनुभवी सेल्समन पाहिजे पगार + कमिशन - **9137758497 / 7021171906** {NC243126}

मस्जिद बंदर आणि मरिन लाईन्स येथे गिफ्ट आर्टिकलच्या शोरुममध्ये कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले/मुली पाहिजेत. **9322260414** {NC243120}

सांताक्रुझ येथे इमिटेशन ज्वेलरीच्या कंपनीत कामासाठी मुली पाहिजेत. संपर्क - **9930577343** {NC243121}

नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ANM NURSING ASSISTANT, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY. OPTOMETRY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 7678007808 / 8850530054** {NC240717}

व्यवसायविषयक

आमच्या कंपनीमध्ये कमी गुंतवणूक मध्ये जास्त प्रॉफिट कमवा ते ही रोजच्या रोज संपर्क **-8433763192/8452037238** {NC243068}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC243104}

वाहन विषयक

इको टॅक्सी विकणे आहे. संपर्क - अली इंटरप्रायझेस कल्याण. मेन - **9004351097** {NC243124}

वर पाहिजे

सुंदर वधु 28, 5.3, 12वी नर्स 12000/- मुलीला आई-वडील नाहीत. काका-काकुंकडे राहते. अपेक्षा, निर्व्यसनी कष्टाळु मुलगा हवा. जातीची शिक्षणाची अट नाही. (त्वरित विवाह) **9579032497** {NC243097}

विवाहविषयक

वधु-वर मेळावा सर्वजाती मराठा, आगरी, बौद्ध कल्याण **9869868620** {NC243060}

आमदार अपात्र सुनावणीचा दिरंगाईमुळे बट्ट्याबोळ

पान १ वरून

याचिकेवर एकदाही सुनावणी झाली नाही. फक्त तारीख पडत राहिली.

दरम्यान सरन्यायाधीशांच्या निवृत्तीची वेळ जवळ आली. १० नोव्हेंबर ही त्यांच्या निवृत्तीची तारीख आहे. पण त्या तारखेला रविवार आणि आज शनिवार असल्याने न्यायालयाचे कामकाज होणार नव्हते. त्यामुळे चंद्रचूड यांच्या कामकाजाचा शेवटचा दिवस काल ८ नोव्हेंबर होता. या शेवटच्या दिवशी सरन्यायाधीश शिवसेनेच्या याचिकेवर निर्णय देतील अशी अपेक्षा होती. मात्र काल ८ नोव्हेंबर रोजी शिवसेनेची याचिका यादीत नसल्याने ती अपेक्षा फोल ठरली. आता ही सुनावणी १८ नोव्हेंबरला होईल असे सांगितले गेले. पण आता तर ही सुनावणी १० डिसेंबरपर्यंत लांबणीवर पडल्याचे संकेत मिळाल्याने शिवसेना ठाकरे गटाच्या उरल्यासुरल्या अपेक्षा धुळीला मिळाल्या.

शिवसेनेनंतर काही महिन्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही फूट पडली. अजित पवारांनी काही आमदारांना सोबत घेऊन पक्ष फोडला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रकरणातही निवडणूक आयोगाने शिवसेनेसारखाच निर्णय दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे पक्षाचे नाव आणि घडयाळ हे पक्षचिन्ह आयोगाने अजित पवार गटाला बहाल केले. राष्ट्रवादी आमदार अपात्रतेप्रकरणी राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेसारखाच निकाल दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीदेखील उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणे आयोगाच्या आणि नार्वेकरांच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. ठाकरे गटाच्या आणि शरद पवार गटाच्या याचिका कालांतराने एकत्रित सुनावणी होत आहे. म्हणजे नवे सरकार स्थापन होण्याच्या आधी राष्ट्रवादीच्या आमदारांच्या अपात्रतेवरही सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येणे शक्य नाही. २६ नोव्हेंबर रोजी चालू विधानसभेची मुदत संपताच सर्व आमदारांची आमदारकी संपुष्टात येईल. त्यामुळे बंडखोरांपैकी जे आमदार पुन्हा निवडून येतील त्यांच्या आमदारकीवर काहीही परिणाम होणार नाही. पर्यायाने नव्या सरकारवरही काहीही परिणाम होणार नाही. आता या याचिका नव्या खंडपीठाकडे सुनावणीस येणार असल्याने नवे खंडपीठ संपूर्ण प्रकरण पुन्हा एकदा ऐकेल. त्यासाठी तीन ते चार महिने किंवा त्याहून जास्त कालावधी लागू शकतो. कदाचित पुढील वर्षीच्या मार्च-एप्रिलमध्ये यावर निकाल येऊ शकेल,अशी माहिती सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी दिली. इतकी दिरंगाई झाल्याने या निर्णयाला फारसा अर्थ राहिलेला नाही.

महाराष्ट्राला कुणाचे एटीएम बनू देऊ नका

पान १ वरून

वेळोवेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला. त्यांच्या विरोधात कारस्थान करून त्यांना निवडणुकीत पराभूत केले. त्यांचे राजकारण संपविण्याचा प्रयत्न केला.जाती-जातींमध्ये द्वेष निर्माण करून एकमेकाशी लढण्यास काँग्रेसने नेहमीच चिथावणी दिली. दलित, शोषित, वंचित आणि आदिवासींची एकजूट होऊ देता कामा नये हेच काँग्रेसचे सुरुवातीपासूनचे सूत्र राहिले आहे. दलित जेवढा कमजोर होईल तेवढी काँग्रेस मजबूत होते आणि देश मजबूर होतो,अशा शब्दात मोदी यांनी काँग्रेसवर हल्ला चढवला. काश्मीरमधील कलम ३७० कलम रद्द करण्याच्या मुद्यावरूनही मोदींनी काँग्रेसवर सडकून टीका केली. जम्मू आणि काश्मीरमध्ये नुकत्याच स्थापन झालेल्या ओमर अब्दुल्ला यांच्या सरकारने विधानसभेत ३७० कलम पुन्हा लागू करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्याला काँग्रेसचा पाठिंबा आहे. कलम ३७० कलम पुन्हा लागू करणे म्हणजे काश्मीरला पुन्हा दहशतवादाच्या आगीत लोटण्यासारखे होईल.बाबासाहेबांच्या संविधानाचा तो घोर अपमान ठरेल. भाजपाने मात्र नेहमीच बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान केला. बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या संविधानाला सर्वोच्च स्थानी मानले. बाबासाहेबांचा जिथे जन्म झाला ते मध्य प्रदेशातील महू, नागपूरची दीक्षाभूमी, मुंबईतील चैत्यभूमी, दिल्लीतील निवासस्थान आणि लंडनमधील स्मारक या पाच पवित्र स्थळांना एकत्र जोडणारी पंचतिर्थ योजना आम्ही सुरू केली. कापूस उत्पादनासाठी ओळखल्या जाणाऱ्या अकोला जिल्ह्यात मागील ७०-७५ वर्षांत कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग आणले गेले नाहीत. उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे येथील कापूस उत्पादक शेतकरी आजही आपली उन्नती साधू शकला नाही. हे चित्र बदलायचे असेल तर पुन्हा एकदा महायुती सरकारलाच निवडून द्या, असे आवाहन मोदी यांनी केले.

CHANGE OF NAME

I **Gulab Vithal Phadke** residing at Near Durga mata Mandir Road, Khindi Pada, Rahivashi Sangh Office, Mulund Colony, Bhandup Complex, Mumbai. 400082. My name has been changed to **Gulab Vitthal Fadke** as per affidavit dated 6th November 2024.

Gulab Vithal Phadke

(Signature by old name)

CHANGE OF NAME

I, **Chaitali Mondal** Residing Room No. 102/A, Shree Saileela Chsl, Near Nandivali Talav, Kalyan East. Changed My Name to **Chaitali Mondal Das** as per Maharashtra State Government Gazette No. (M-2263291) dtd. July 14-20, 2022.

Chaitali Mondal

(Signature by old name)

भाजपाच्या जाहिराती धादांत खोट्या

पान १ वरून

टिळक भवनात ही पत्रकार परिषद झाली. यावेळी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते पवन खेराही उपस्थित होते. ते म्हणाले, आपली रेघ मोठी करता येत नसल्याने भाजपा दुसऱ्यांची रेघ लहान करण्याचा प्रयत्न करत आहे. काँग्रेसची सगळी इकोसिस्टम खोटेपणावर आधारित आहेत. त्यात पंतप्रधान मोदीही सहभागी आहेत.

या पत्रकार परिषदेत हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यांनी सांगितले की, महाराष्ट्रात निवडणूक आहे आणि हिमाचल प्रदेशची चर्चा होत आहे. आम्ही हिमाचल प्रदेशात कशा योजना राबवतो आहे, ते कुणीच विचारत नाही.सत्याला नेहमीच असत्याशी सामना करावा लागतो. महाराष्ट्राप्रमाणेच हिमाचल प्रदेशनेही ऑपरेशन कमळचा सामना करावा लागला. पण जनतेने काँग्रेसच्या गॅरंटीवर आणि सरकारच्या कामकाजावर विश्वास ठेवत पुन्हा सत्ता दिली. काँग्रेसचे सरकार येताच पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत आम्ही जुनी पेन्शन योजना लागू केली. त्यामुळे ज्यांना ५००० रुपये मिळत होते त्यांना आता ५० हजार रुपये मिळत आहेत. मक्याला प्रतिकिलो ३० रुपये, गहू ४० रुपये किलो, तर गाईच्या दुधाला प्रति लिटर ४५ तर म्हशीच्या दुधाला ५५ रुपयांचा हमीभाव देण्याचा निर्णय घेतला. असा हमीभाव देणारे हिमाचल प्रदेश हे एकमेव राज्य आहे. ५८ वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीला दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत. १८ वर्षांवरील मुलींना १५०० रुपये तर वैद्यकीय शिक्षण, पीएचडी करणाऱ्या मुलींनाही आर्थिक मदत दिली जात आहे. अनाथ मुलांचा २७ वर्षांपर्यंतचा सगळा खर्च, विधवांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्चही सरकारकडून केला जाणार आहे. या गॅरंटींची पूर्तता करण्यासाठी महसूल उत्पन्नाचे स्त्रोतही वाढवले आहेत.

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी म्हणाले की, पंतप्रधान यांनी खोटे बोलणे सोडले नाही तर आम्ही खरे बोलणे सोडणार नाही. तेलंगणामध्ये आम्ही योजना राबविल्या आहेत, याची वस्तुस्थिती तुमच्यासमोर ठेवणे माझी जबाबदारी आहे.काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी स्वतंत्र तेलंगणाचे आश्वासन दिले होते, ते त्यांनी पूर्ण केले. विधानसभा निवडणुकीच्या वेळी ६ गॅरंटी जाहीर केल्या होत्या. तेलंगणात काँग्रेसचे सरकार आल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांची कर्जमाफी दिली, याचा फायदा २२ लाख शेतकऱ्यांना झाला असून या योजनेच्या माध्यमातून बळीराजाला १८,००० कोटी रुपये वितरित केले. आम्ही १० महिन्यांत ५० हजार सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत. महालक्ष्मी योजनेअंतर्गत मोफत बस प्रवास सुरू केला असून आतापर्यंत राज्य परिवहन महामंडळाला ३,४०० कोटी रुपये दिले आहेत. ५९ लाख कुटुंबांना ५०० रुपयांत गॅस सिलिंडर दिले जात आहे. गृहज्योती योजनेअंतर्गत ५० लाख कुटुंबांना २०० युनिट वीज मोफत दिली जात आहे. महालक्ष्मी योजनेसाठी दरवर्षी ४ हजार कोटी अशी पाच वर्षांसाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसने तेलंगणात कर्जमाफी दिली नाही, असे ट्विट केले होते पण मी त्यांना कर्जमाफीचा अहवाल पाठवल्यानंतर त्यांनी ते डिलीट केले. भाजपाकडे सांगण्यासारखे काहीही नाही. म्हणून ते काँग्रेस विरोधात जनतेची दिशाभूल करत आहेत. एकनाथ शिंदे आणि अजित पवार गुजरातचे गुलाम बनून काम करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र पुन्हा भाजपाच्या हातात देऊ नका, नाहीतर महाराष्ट्रातील लोकांना खूप काही गमवावे लागेल, असे रेवंत रेड्डी म्हणाले.

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार म्हणाले की, राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान कर्नाटकात २२ दिवसांची पदयात्रा केली, यावेळी जनतेला भेडसावणाऱ्या समस्या, त्यांचे प्रश्न त्यांनी जाणून घेतले. त्यातूनच कर्नाटकात ६ गॅरंटी देण्यात आल्या. काँग्रेस सत्तेत येताच त्याची अंमलबजावणी सुरु केली. कर्नाटकातील १ कोटी २२ लाख महिलांना 'गृहलक्ष्मी' योजनेतून दरमहा २००० रुपये मिळत आहेत. १ कोटी ६४ लाख कुटुंब 'गृहज्योती' योजनेचा लाभ घेत आहेत. ४.०८ कोटी लोकांना 'अन्नभाग्या' योजनेअंतर्गत १० किलो मोफत तांदूळ दिले जात आहेत. 'शक्ती' योजनेतून आतापर्यंत ३२० कोटी महिलांनी मोफत बस प्रवास केला आहे.

'युवा निधी' योजनेद्वारे ५ लाख विद्यार्थ्यांना महिन्याला ३,००० रुपये मिळत आहेत. सरकार स्थापन झाल्यानंतर ६० दिवसांत या सर्व गॅरंटी लागू केल्या असून यासाठी आतापर्यंत ५२ हजार कोटी रुपये खर्च केला आहेत. कर्नाटकाचे बजेट ३ लाख ६५ हजार कोटींचे असून देशातील अनेक भाजप शासित राज्यांपेक्षा कर्नाटकची अर्थव्यवस्था उत्तम आहे. भाजपाच्या नेत्यांना मी आव्हान करतो की, मी विशेष विमान व व्होल्वो बसची व्यवस्था करतो त्यांनी कर्नाटकात येऊन ३३ जिल्ह्यांचा प्रवास करून जनतेशी बोलून या गॅरंटीबद्दल विचारून खात्री करुन घ्यावी.

वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

निकाल महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी · सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 09/11/2024

मालिका	GL-00	GL-01	GL-02	GL-03	GL-04
पहिले बक्षिस रु. 10,000/-	2753	2733	0507	2992	1599

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/-	0918	3050								
तिसरे बक्षिस रु. 2000/-	2552	2553	3042	4362	9845					
चौथे बक्षिस रु. 1000/-	0130	0348	1422	2114	2219	4935	5381	7084	7181	7941
पाचवे बक्षिस रु. 500/-	0926	1737	3685	4240	4722	7082	7839	8158	8635	9721

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

सहावे बक्षिस रु. 300/-	0840	1749	2529	3379	4641	5311	6278	7307	7877	9268
	0907	1761	2541	3439	4644	5320	6399	7367	7882	9272
0027	1067	1762	2643	3462	4669	5462	6403	7373	7981	9283
0051	1173	1799	2723	3533	4704	5552	6464	7415	8000	9301
0097	1178	1817	2743	3536	4745	5575	6605	7456	8138	9323
0109	1279	1918	2759	3569	4760	5598	6636	7505	8239	9329
0162	1286	1931	2778	3623	4804	5654	6639	7563	8268	9498
0202	1340	1971	2814	3636	4810	5754	6662	7601	8349	9617
0300	1391	2001	2926	3778	4824	5778	6686	7686	8399	9669
0400	1411	2003	3003	3843	4831	5857	6690	7702	8573	9670
0490	1429	2177	3046	3994	4846	5922	6769	7704	8579	9739
0513	1486	2209	3093	4016	4972	5952	6827	7705	8685	9762
0524	1507	2210	3105	4024	5041	5981	6845	7706	8814	9790
0570	1540	2254	3119	4089	5051	5985	6999	7708	8880	9883
0700	1600	2286	3132	4191	5123	6055	7017	7726	8958	9904
0707	1611	2315	3210	4194	5170	6063	7073	7737	9049	9909
0723	1640	2412	3222	4415	5196	6096	7097	7763	9068	9952
0775	1701	2413	3320	4483	5234	6130	7187	7793	9090	9997
0790	1727	2416	3359	4586	5255	6232	7300	7820	9111	9998

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी · सोडत सायं. 4:30 वाजता

• प्रभालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 09/11/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-	SP-04 : 5496	श्री अष्टविनायक लॉटरी, औरंगाबाद	

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/-	5187	किशोर लॉटरी सेंटर, सांगली	
तिसरे बक्षिस रु. 2000/-	1060	5588 पवार लॉटरी - ठाणे	5915 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

1106	2104	3306	4170	5015
1122	2335	3319	4242	5018
1570	2407	3333	4273	5075
1615	2540	3395	4484	5729
1788	2722	3501	4560	5748
1913	3029	3632	4601	5804
1917	3060	3731	4768	5915
1961	3079	3971	4931	5995

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी · तिकीट किंमत रु. 50/- · सोडत क्र. 45 · सोडत दिनांक 09/11/2024

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख	ML-02 : 2087					
उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/-	पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2087	महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई				

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/-	1237	1332	1563	1590	2097	4789
तिसरे बक्षिस रु. 1000/-	2297	3551	4008	5390	6735	6806
चौथे बक्षिस रु. 500/-	2112	2217	3380	4361	5298	6616
पाचवे बक्षिस रु. 200/-	1065	2563	2779	3652	6624	6991

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

रु.100/- (सर्व मालिकांसाठी)		1813	2247	2675	3073	3428	3900	4362	4934	5358	5707	6261	6619
		1816	2249	2700	3074	3438	3905	4389	4940	5371	5720	6262	6621
1009	1372	1833	2251	2702	3084	3440	3907	4396	4949	5375	5729	6271	6625
1010	1373	1880	2253	2715	3105	3443	3923	4414	4954	5380	5736	6279	6626
1012	1389	1888	2255	2724	3130	3446	3934	4421	4962	5384	5749	6287	6627
1013	1405	1889	2272	2725	3139	3458	3938	4427	4974	5387	5755	6301	6634
1040	1411	1897	2275	2729	3157	3510	3943	4429	4997	5397	5756	6313	6662
1041	1416	1906	2282	2768	3163	3539	3944	4436	5009	5404	5758	6314	6671
1071	1450	1918	2291	2790	3165	3540	3950	4450	5022	5414	5779	6317	6699
1077	1451	1971	2297	2825	3176	3543	3963	4463	5038	5423	5780	6326	6720
1112	1454	1978	2300	2835	3180	3585	3969	4496	5039	5444	5787	6332	6723
1115	1512	1991	2306	2857	3217	3595	3983	4499	5051	5458	5826	6337	6735
1124	1515	2002	2312	2862	3219	3598	4004	4501	5053	5472	5832	6369	6756
1125	1525	2019	2313	2868	3237	3610	4009	4507	5055	5475	5873	6373	6762
1136	1534	2022	2325	2903	3241	3620	4014	4534	5070	5492	5881	6381	6766
1141	1537	2025	2339	2909	3267	3638	4027	4540	5075	5497	5889	6396	6771
1150	1543	2032	2366	2912	3270	3683	4043	4541	5083	5500	5896	6408	6780
1154	1555	2036	2396	2925	3286	3693	4052	4543	5097	5504	5935	6424	6786
1160	1589	2072	2398	2938	3291	3707	4062	4547	5131	5506	5952	6437	6792
1163	1596	2082	2422	2946	3303	3735	4079	4576	5139	5510	5954	6441	6802
1167	1605	2102	2436	2948	3306	3736	4090	4624	5152	5515	5956	6442	6803
1170	1607	2125	2449	2961	3309	3748	4107	4632	5175	5537	5997	6446	6806
1174	1613	2132	2455	2970	3328	3755	4164	4666	5235	5544	6040	6458	6808
1181	1617	2142	2492	2972	3329	3778	4170	4696	5242	5550	6074	6461	6815
1184	1638	2145	2499	2973	3332	3793	4194	4749	5252	5551	6076	6465	6818
1185	1672	2151	2510	2979	3333	3807	4200	4794	5263	5564	6083	6492	6821
1192	1680	2179	2517	2982	3343	3831	4242	4797	5285	5573	6091	6536	6835
1221	1712	2180	2519	2992	3351	3834	4243	4816	5286	5583	6170	6554	6860
1233	1713	2193	2521	2998	3358	3837	4256	4830	5290	5585	6177	6568	6890
1252	1715	2202	2528	3035	3360	3852	4266	4847	5294	5590	6182	6584	6901
1260	1717	2208	2567	3038	3379	3863	4276	4848	5307	5596	6201	6587	6911
1270	1758	2220	2578	3042	3382	3866	4277	4863	5310	5652	6216	6610	6917
1309	1762	2224	2587	3052	3383	3875	4294	4884	5314	5675	6229	6614	6968
1348	1783	2226	2621	3053	3389	3878	4304	4893	5315	5686	6235	6616	6976
1360	1788	2234	2625	3060	3409	3882	4342	4894	5338	5688	6256	6617	6981
1371	1811	2236	2666	3069	3421	3894	4348	4912	5350	5701	6260	6618	6997

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी · सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 09/11/2024

पहिले बक्षिस रु. 10000/-	MG-00 : 1482				

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/-	निकाले 7937	अंबिका एजन्सी - दादर, मुंबई			
तिसरे बक्षिस रु. 1000/-	1700	1822	6397 किशोर लॉटरी सेंटर, सांगली	6869 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर	8883 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

चौथे बक्षिस रु. 400/-	2011	3464	3918	4692	5669	6629	7506	8381
1019	2252	3508	3934	4989	5694	6656	7621	8443
1188	2261	3579	3937	5095	5745	6662	7791	8666
1277	2442	3609	4047	5157	5771	6697	7812	8804
1601	2542	3710	4339	5168	5939	6753	7851	8831
1791	2602	3711	4352	5200	5953	6967	7957	8858
1810	2839	3795	4400	5425	6559	6970	8238	8886
1890	2872	3899	4477	5455	6586	6999	8309	8947
1987	3406	3916	4523	5650	6609	7472	8338	8987

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

Nehru Centre Presents
नेहरू सेंटर आयोजित
बालदिना निमित्त
महाराष्ट्रातील उत्साही तरुणांच्या समूहाद्वारे, महाराष्ट्रातील समृद्ध लोककलांचा वापर करून वन्यजीवांविषयी जनजागृती या ध्येयाने प्रेरित पारंपारिक संगीत, नृत्य आणि नाटकाचा उपक्रम!
संगीत बिबट आख्यान
सीताई क्रिएशन्स
शुक्रवार, दि. २२ नोव्हें. २०२४ सायं.७.०० वाजता.
नेहरू सेंटर सभागृह, वरळी
कार्यक्रमाच्या विनामूल्य प्रवेशिका
सोमवार, दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. पासून नेहरू सेंटर सभागृहाच्या तिकीट खिडकीवरती उपलब्ध असतील.

पाकिस्तानातील क्वेट्टा रेल्वे स्थानकावर बॉम्बस्फोट

पान १ वरून - त्यामुळे फलाटावर प्रवाशांची गर्दी होती. यामध्ये पाकिस्तानी सैन्यातील अनेक सैनिकही होते. प्रवासी रेल्वेची वाट पाहात असताना अचानक हा स्फोट झाला. त्यानंतर फलाटावर एकच गोंधळ उडाला. स्फोटानंतर तातडीने मदतकार्य सुरु केले गेले. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातही आपत्कालीन स्थिती निर्माण झाली. त्यामुळे कामावरून घरी गेलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांनाही परत बोलावण्यात आले. अनेक जखमींची स्थिती गंभीर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतो. या स्फोटात फलाटाचे छत उद्ध्वस्त झाले. स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू आला. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी या हल्ल्याचा निषेध केला असून हल्ला घडवणाऱ्यांना सोडणार नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी तातडीने एक उच्चस्तरीय बैठक बोलावत या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

१८५७ च्या स्वातंत्र्य समरातील ऐतिहासिक शस्त्रसाठा सापडला

पान १ वरून

यांनी तिथे आणखी खोदकाम केले असता ही ऐतिहासिक शस्त्रे त्यांच्या हाती लागली.

बाबू राम यांनी ती जुनाट शस्त्रे पाहून याची माहिती सरकारला देण्याचा निर्णय घेतला. थेट जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन त्यांनी या शस्त्रसाठ्याबद्दल माहिती दिली. त्यानंतर जिल्हा न्यायदंडाधिकारी यांच्या उपस्थितीत शस्त्रसाठा ताब्यात घेऊन तो भारतीय पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आला.

श्री तुळजा भवानी प्रसन्न फिल्म्स
महान सामाजिक मराठी चित्रपट
निर्माता,लेखक,गीतकार,अभिनेता सुनिल भूमकर निर्मित
आई तुझा संसार
निर्माता,लेखक,गीतकार,अभिनेता - सुनिल भुमकर,
सहनिर्माता-संजय जाधव,दिग्दर्शन,छायांकन-मोहनदास मुद्ये ,
गीत -शांताराम नांदगावकर,राज पवार ,
संगीत - विजय नारायण ,राज पवार.
वितरक -मोहम्मद नवरंगी ,

लाडक्या बहिणींना व आईंना मोफत प्रवेश

सांगली (जत)
प्रतिक सिनेमा येथे
हा प्रयोग यशस्वी झाला

: शुभेच्छुक :
श्री. एकनाथजी शिंदे ,
श्री. देवेंद्रजी फडणवीस
व निर्माता - अभिनेता :
सुनिल भूमकर

: वितरक :
जीएमई पिक्चर्स :
९८२२२२९५२६

भारतीय रेल्वेचे नवे ॲप येणार

मुंबई- भारतीय रेल्वेचे नवे ॲप लवकरच येणार आहे. या सुपर ॲपमध्ये व्यक्ती आपल्या गरजेनुसार सुविधांची निवड करू शकणार आहे. रेल्वेच्या सुविधांसाठी यापूर्वी आयआरसीटीसी रेल कनेक्ट, ई-कॅटरिंग, रेल मदद आणि युटीएस अशी वेगवेगळी ॲप वापरावे लागत होती. आता या सर्व सुविधा एकच ॲपवर उपलब्ध होणार आहे. या ॲपमध्ये दोन पर्याय असणार आहे. पहिला पॅसेंजर तर दुसरा फ्रेट पर्याय आहे.

नवा काळ
विजय

ट्रम्प आले! पुढे काय?

नुकत्याच अमेरिकेत झालेल्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांचे राष्ट्राध्यक्ष म्हणून पुनरागमन झाले. खरंतर ट्रम्प यांचा हा विजय ऐतिहासिक म्हणावा लागेल. गेल्या एका शतकभरात एका निवडणुकीत हरलेले राष्ट्राध्यक्ष पुढच्या निवडणुकांमध्ये पुन्हा निवडून येतात असे झालेले नाही. विशेष म्हणजे माध्यमांमध्ये आणि समाजमाध्यमांमध्ये अत्यंत नकारात्मक प्रतिमा असूनही त्यावर मात करुन परत येणारे ट्रम्प हे निक्सन यांच्यानंतर दुसरे राष्ट्राध्यक्ष ठरतात. पण निक्सन यांच्याहूनही ट्रम्प यांचा रुबाब कितीतरीपट मोठा आहे. आता ट्रम्प आल्याने रशिया–युक्रेन युद्ध थांबेल? इस्त्रायल–पॅलेस्टाइनमधील संघर्षाला विराम मिळेल? भारत–अमेरिका संबंधांना कलाटणी मिळेल? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.



● चित्ततोष खांडेकर

सर्वप्रथम ट्रम्प हे काही अब्राहम लिंकन किंवा जॉन ॲडम्स नाहीत. देशाच्या राजकारणाची दशा आणि दिशा दोन्ही कायमस्वरुपी बदलण्याची ताकद या दोन्ही नेत्यांमध्ये होती, ती ट्रम्प यांच्यात आहे का? हा खरा प्रश्न आहे. कृष्णवर्णीयांना न्याय मिळवून देण्यासाठी ठामपणे भूमिका घेण्यामुळे लिंकन यांची हत्या झाली. आपली हत्या होईल हे माहीत असूनही लिंकन आपल्या न्याय्य भूमिकांवर ठाम राहिले. तसे ट्रम्प कितपत करतील? आणि केले तर कोणत्या मुद्द्यांसाठी करतील?

निवडणुका जिंकल्यावर मी अमेरिकेला तिच्या सुवर्णकाळात परत घेऊन जाईन असे ट्रम्प म्हणाले. पण असे ट्रम्प का म्हणतात याचा विचार करणे जास्त महत्त्वाचे आहे. अमेरिकेसारख्या देशात स्थानिकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते आहे. एकेकाळी जागतिक महायुद्धांना कलाटणी देणारा देश अशी अमेरिकेची ख्याती होती. तो देश आज इस्त्रायल–पॅलेस्टाइन किंवा रशिया–युक्रेन यांच्यातील युद्धही थांबवू शकत नाही आणि संपवूही शकत नाही अशा स्थितीस पोहोचला आहे. एकीकडे भारत आणि चीनमधून येणारे स्थलांतरितांचे लोंढे स्थानिकांच्या नोकऱ्याही लाटत आहेत आणि जमिनीही. तर दुसरीकडे भारत आणि चीन जागतिक व्यापार संघटनेत स्वत:चे कंपू बनवून अमेरिकेस जेरीस आणत आहेत.संयुक्त राष्ट्रसंघात चीनकडून दिला जाणारा निधी प्रचंड वाढला असून हे अमेरिकेच्या जागतिक महसत्तेच्या प्रतिमेला धक्का लावू शकते. अशावेळी ट्रम्प सुवर्णकाळाच्या वल्गना कशा पूर्ण करतात हा खरा प्रश्न आहे.

चीनला चाप बसवण्यासाठी भारताचा वापर करणे, अशी नीती ट्रम्प वापरतील असे यावेळी म्हणता येणार नाही. कारण एरवी भारताच्या पंतप्रधानांचे कौतुक करणारे ट्रम्प ,यावेळी भारताच्या धोरणांबद्दल निवडणूक प्रचारामध्ये प्रचंड आक्रमक होते. अमेरिकेतून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर सर्वाधिक कर बसवणारा देश म्हणजे भारत आणि त्याला योग्य पद्धतीने उत्तर दिले जाईल असा ट्रम्प यांचा पवित्रा होता. हा पवित्रा निवडणुकीनंतर कायम राहिला, तर भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंची मागणी कमी होऊ शकते. याचा परिणाम भारतातील परकीय चलनाच्या गंगाजळीवर होऊ शकतो. परिणामी जागतिक बाजारपेठेत रुपया घसरू शकतो आणि तसा तो घसरल्यास पेट्रोलचे दर अधिक वाढून महागाई वाढू शकते.

दुसरी गोष्ट म्हणजे रशिया–युक्रेन युद्धाचा फायदा घेत भारताने रशियाकडून स्वस्त दरात तेल घेण्यास सुरुवात केली. ट्रम्प यांना हे फार मंजूर होईल असे वाटत नाही. भारताने अमेरिकेकडून तेल विकत घ्यावे यासाठी ट्रम्प आग्रही होऊ शकतात. परिणामी पेट्रोल महागून, महागाईच्या भस्मासुराचा भडका उडू शकतो. पण अशी महागाईत झालेली वाढ भारताने कित्येकदा पाहिली आहे. दुसरीकडे अमेरिकेतील सत्तेत कोणीही आले तरी संबंध खराब होणार नाहीत उलट वृद्धिंगत होतील, अशी रणनीती भारताने एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्वीकारली असल्यामुळे, परकीय संबंधांवर फार परिणाम होणार नाहीत.अर्थव्यवस्थेला मात्र महागाईसारखे अजून काही आघात सहन करावे लागू शकतात.

पण ट्रम्प येण्याचा सगळ्यात मोठा फटका भारतापेक्षा अनिवासी भारतीयांनाच जास्त बसू शकतो. कारण भारत आणि चीनमधून येणाऱ्या स्थलांतरितांवर आगपाखड करणे हा ट्रम्प यांचा शिरस्ता आहे. स्थलांतरित हे स्थानिकांच्या नोकऱ्या गिळंकृत करतात ही ट्रम्प यांची धारणा आहे. त्यामुळे या स्थलांतरितांसंबंधातील धोरणांमध्ये ट्रम्प बदल करू शकतात. यामुळे अमेरिकेत राहणाऱ्या किंवा जाऊ इच्छिणाऱ्या भारतीयांच्या आयुष्यावर नक्कीच परिणाम होऊ शकतो.

पुढचा महत्त्वाचा मुद्दा येतो जागतिक व्यापार संघटनेचा. या संस्थेचे अस्तित्वच ट्रम्प यांच्या पुनरागमनामुळे धोक्यात आले आहे. कारण गेल्या कारकीर्दीत ट्रम्प यांनी या संघटनेतील अनेक प्रक्रिया अमेरिकेचा 'व्हेटो' वापरून ठप्प केल्या होत्या. जगातील विकसित श्रीमंत देश गरीब विकसनशील देशांचे व्यापारात शोषण करणार नाहीत, यासाठी जागतिक व्यापार संघटना स्थापन करण्यात आली होती. पण अशी संघटना जर कोणतेच निर्णय घेऊ शकत नसेल, तर भारतासारख्या देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासंबधीचे स्वत:चे प्रश्न कसे आणि कुठे सोडवावे हा प्रश्न उद्‌भवतो.

'क्लायमेट चेंज' सारख्या मुद्द्यांना ट्रम्प गौण मानतात. कार्बन उत्सर्जन कमी करावे यासाठी ट्रम्प अजिबात आग्रही नसतात. त्यामुळे वातावरण बदलाची आडकाठी घेऊन भारतात नव्याने उभ्या राहणाऱ्या रासायनिक उद्योगांवर चाप बसवण्याचे अमेरिकेचे प्रयत्न येत्या काळात कमी होतील.तसेच दुसरीकडे ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात भारत–अमेरिकेमधील संरक्षण संबंधांमध्ये भरपूर सुधारणा झाली होती. अनेक महत्त्वाच्या संरक्षण करारांवर या दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली होती. याचीच पुनरावृत्ती होऊन संरक्षण तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत भरपूर प्रगती करू शकतो.

पण भारतासाठी सगळ्यात जमेची बाजू ठरेल ते म्हणजे ट्रम्प यांचे दक्षिण आशियातील धोरण. बिडेन यांचे सगळे प्रयत्न दक्षिण आशियात भारताचे महत्त्व कमी करण्याकडे होते. त्यासाठी मालदीवला निधी देणे,पाकिस्तानला मिळणारा निधी वाढवणे, बांगलादेशमधील भारतपुरस्सर सरकार पाडून भारत विरोधी सरकार सत्तेत बसवणे असे सगळे प्रयत्न त्यांचे सरकार करत होते.ट्रम्पची नीती मात्र याच्याबरोबर उलट होती. पाकिस्तानला मिळणारा निधी थांबवणे आणि मालदीव, बांगलादेश, श्रीलंका यांसारख्या देशांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ट्रम्प भारताची मदत घेऊ शकतात. त्यात यावेळच्या निवडणूक प्रचारामध्ये, बांगलादेशमधील हिंदू अल्पसंख्यांकांचे प्रश्न आपल्याला खूप महत्त्वाचे वाटतात हे सांगत ट्रम्प यांनी आपल्या दक्षिण आशियातील धोरणाबद्दल सुतोवाच केलेलेच आहे.

ट्रम्प यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणाबद्दलचे विचार अगदी स्पष्ट आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात फार ढवळाढवळ करण्यापेक्षा अमेरिकेने घरगुती प्रश्न सोडवण्यावर जास्त भर द्यावा असे साहेबांचे मत आहे. फक्त जिथे अमेरिकेचे तोटे होत आहेत, तिथे मात्र अमेरिकेने आपली भूमिका सोडू नये असा ट्रम्प यांचा खाक्या आहे. हा खाक्या कायम राहिल्यास रशिया–युक्रेन किंवा इस्त्रायल पॅलेस्टाइनवर तोडगा काढण्याचा फार प्रयत्न ते करणार नाहीत. उलट, ही युद्ध चालू असताना अमेरिकेच्या आर्थिक धोरणांना कसा फटका बसणार नाही, याचीच काळजी ते जास्त घेतील. त्यामुळे 'नाटो'ला मिळणारा निधीही कमी होऊ शकतो, आणि या युद्धांचे प्रश्न अधिक चिघळू शकतात.

पण या सगळ्या संभाव्य निर्णयांपेक्षा खरी काळजी असायला हवी ती ट्रम्प यांच्या स्वभावाची. ट्रम्प कुप्रसिद्ध आहेत ते त्यांच्या बोलभांड स्वभावासाठी. इतर राष्ट्रप्रमुखांसोबत झालेल्या गोपनीय चर्चा अनेकदा ट्रम्प यांनी बोलता–बोलता माध्यमांसमोर उघड केल्या होत्या. त्यांच्या या स्वभावामुळे भारतासकट इतर देशांचे अमेरिकेशी संबंध खराब होऊ शकतात. याच बोलभांड स्वभावामुळे अमेरिकेतील देशांतर्गत वातावरणही गढूळ होऊ शकते. यावर ट्रम्प कसे नियंत्रण मिळवतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

याव्यतिरिक्त अनेक धोरणांवर ट्रम्प हे बिडेनहून काही वेगळी भूमिका घेतील असे दिसत नाही. सुरुवातीला सांगितले त्याप्रमाणेच ट्रम्प हे काही लिंकन किंवा ॲडम्स नाहीत. जितके त्यांचे समर्थक त्यांना डोक्यावर घेतात, तितके कर्तृत्ववानही ट्रम्प नाहीत, आणि जितकी आंतरराष्ट्रीय माध्यमे त्यांच्यावर टीका करतात, तेवढे हिंसक आणि विचित्रही ट्रम्प नाहीत. रिपब्लिकन पक्षाची पारंपरिक धोरणे पुढे नेणे आणि त्यात आंतरराष्ट्रीय व्यापाराला डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेणे हाच ट्रम्प यांचा महत्त्वाचा अजेंडा असेल. त्यामुळे अमेरिकेतील सत्तांतर फार दूरगामी परिणाम करणारे नाही. फक्त भारतीय राजकारणी ट्रम्प यांच्या स्वभावाशी कसे जुळवून घेतात, यावर या देशांमधील पुढील चार वर्षांचे संबंध अवलंबून आहेत.

(लेखक टाटा सामाजिक विज्ञान संस्थान,मुंबई येथे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयातील संशोधक

इजिप्तच्या शाही थडग्यात भारतीय कापड

इजिप्तमधील एका ५००० वर्षे पुरातन अशा फॅरोच्या थडग्यात 'इकत' कापडाचे तुकडे सापडले आहेत. भारतातील ओडिशा राज्यातील इकत शैलीतील ही साडी असल्याचे सांगितले जाते. भारत आणि इजिप्त यांच्यातील हजारो वर्षे चालत असलेल्या व्यापाराचा हा पुरावाच आहे. तसेच या शोधामुळे भारताच्या समृद्ध प्राचीन वस्त्रपरंपरेचे जागतिक स्तरावरील महत्त्व अधोरेखित होत आहे.

इकतला प्रतिष्ठा...

फॅरो हे प्राचीन इजिप्तमधील राजे आणि शासक होते. इजिप्तमध्ये फॅरोंना फक्त राजा किंवा शासक म्हणूनच नव्हे, तर ईश्वर समजून पूजले जात असे. इजिप्शियन लोकांत मरणोत्तर जीवनाची कल्पना रूढ होती. त्यामुळेच इजिप्शियन संस्कृतीत थडगी सजवली जात असत. मृत्यूनंतर राजा देवाजवळ जातो आणि लोकांच्या भल्यासाठी देवांशी बोलतोय त्यामुळे या थडग्यांमध्ये अनेकदा त्यांच्या आवडीच्या वस्तू, उंची वस्त्र, दागिने ठेवले जात. अशाच एका फॅरोच्या थडग्यात सापडलेल्या इकत कापडावरून हजारो वर्षांपूर्वीपासून भारतीय कापडाला उंची वस्त्र म्हणून किती मान होता ते दिसून येते. परदेशातही शाही दफनासाठी योग्य इतकी प्रतिष्ठा त्याकाळी इकत कापडाने प्राप्त केली होती.

जुना अस्तित्वात असणारा तुकडा...

स्कूल ऑफ फॅशनवर्ल्ड युनिव्हर्सिटी ऑफ डिझाईन, सोनीपतमधील प्रोफेसर जॉन वर्गीस, यांच्या मते, इकतचा सर्वात जुना अस्तित्वात असणारा तुकडा इजिप्शियन फॅरोच्या थडग्यात सापडला होता. यावरून इकत कलेची प्राचीनता आणि भारतीय वस्त्रोद्योगाची जागतिक व्याप्ती लक्षात येते. या थडग्यात सापडलेला इकतचा तुकडा ओडिशा राज्याशी संबंधित होता.

शतकानुशतके, इकत कलेचा वापर कापडांवर क्लिष्ट, रंगीबेरंगी आकार तयार करण्यासाठी केला जात असे. अनेकदा दक्षिण आणि आग्नेय आशिया, मध्य आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांसारख्या प्रदेशांमध्ये सामाजिक स्थिती आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक म्हणून इकत वस्त्राने काम केले आहे.

इकतचे मूळ...

'इकत' या शब्दाचे मूळ इंडोनेशियन आहे. २०व्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा डच विद्वानांनी ईस्ट इंडीज द्वीपसमूह (आज इंडोनेशिया) च्या समृद्ध वस्त्र परंपरांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली तेव्हा युरोपियन वस्त्रोद्योगाच्या शब्दसंग्रहात इकत या नव्या शब्दाची भर पडली. इकत हा शब्द मलय–इंडोनेशियन भाषेतील 'मेंगिकॅट' या शब्दांपासून बनला आहे. याचा अर्थ बांधणे असा होतो. भारताने, इकत कापड शतकानुशतके जपले आहे, त्यांच्या गुंतागुंतीच्या डिझाइन बनवणे ही कला आहे. ही कला म्हणजे प्रत्येक कारागिराची विशिष्ट शैली असते.प्रत्येक इकत तुकडा कारागिराचे कौशल्यच नव्हे तर ओडिशा, गुजरात, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा यासारख्या इकत उत्पादक प्रदेशांतील सांस्कृतिक स्वरूपे आणि प्रतीके देखील प्रतिबिंबित करतो.

रेशीम मार्गावर इकत

प्राचीन इजिप्तच्या थडग्यात जेव्हा संशोधकांनी पुरातन कापडाचा तुकडा शोधला, तेव्हा तो त्या काळी इजिप्तमध्ये मिळणाऱ्या एखाद्या वस्त्राचा नमुना असावा असे त्यांना सुरुवातीला वाटले. परंतु या तुकड्याचा सखोल अभ्यास केल्यानंतर या कापडाचा पोत, त्यावर काढलेले डिझाइन पाहून हे इजिप्तमधील कापड नसून भारतातील इकत कापड असल्याची खात्री संशोधकांना पटली. कार्बन–डेटिंगनुसार हे कापड इ.स. पहिल्या ते दुसऱ्या शतकातील असल्याचे समजले. हा कालखंड रेशीम मार्गावरच्या व्यापाराचा कालखंड होता. रेशीम मार्ग म्हणजे युरोप, मध्य आशिया, भारत आणि चीन यांना जोडणाऱ्या दोन हजार वर्षांपूर्वीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारीमार्गांचे जाळे होय. या मार्गावरील व्यापारात रेशीम ही मुख्य वस्तू असल्याने या व्यापारीमार्गाला 'रेशीम मार्ग' असे नाव रूढ झाले. या मार्गाने भारतातून मसाले, रेशीम, मौल्यवान रत्ने यांसारख्या अनेक गोष्टी निर्यात केल्या जात असत.

सांस्कृतिक देवाणघेवाण

इजिप्तच्या थडग्यात हा इकत कापडाचा तुकडा आला कसा? हा प्रश्न अनेक संशोधकांना बुचकळ्यात टाकणारा होता. परंतु याचा संबंध व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीशी संबंधित आहे. इतिहासकारांचे मत आहे की या काळात भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील बंदरे व्यापाऱ्यांनी गजबजलेली असायची. इजिप्शियन व्यापारी, पर्शिया, रोम आणि अरब व्यापारी भारतीय कापड घेण्यास उत्सुक असत. भारतीय कापड केवळ सौंदर्यासाठीच नव्हे तर टिकाऊपणासाठीही ओळखले जात असे. हा व्यापार इतका व्यापक होता की भारतातील कापड, विशेषत: इकत आणि सूती कापड, जगाच्या काही भागांमध्ये चलन म्हणून वापरले जात होते.

एका वाक्यात इकतची महती सांगायची तर इकत फक्त एक कापड नसून दोन प्राचीन संस्कृतींना जोडणारा 'धागा' होते.

गोडवा बिहारच्या ठेकुआचा...

आजकाल डोनट्स, मॅकरॉन आणि क्रॉसाँ यासारख्या परदेशी गोड पदार्थांच्या साम्राज्यात असाही एक साधा गोड पदार्थ आहे. मोहक मिठाई आहे, ज्याची चव आपल्याला थेट गावच्या मातीची,साजूक तुपाची आणि चुलीवरच्या खमंग चवीची आठवण करून देते. हा पदार्थ म्हणजे– ठेकुआ. बिहार, झारखंड आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांतील लोकांसाठी ठेकुआ फक्त एक मिठाई नाही, तर छटपूजेचा पवित्र प्रसाद आहे, कौटुंबिक समारंभांचा आणि थंडीच्या गुलाबी आठवणींनी भरलेल्या गप्पांच्या रात्रीचा एक अविभाज्य भाग आहे. छट पूजेला घराघरात हमखास बनणाऱ्या या ठेकुआचा साधेपणा आणि स्वाद हेच खरे सौंदर्य आहे.

प्रत्येक घासात परंपरा

गव्हाच्या पिठात गूळ, खोबरे, साजूक तूप, बडीशेप आणि वेलची घालून तयार केल्या जाणाऱ्या ठेकुआला तळून एकदम खमंग बनवले जाते. त्याच्या समृद्ध चवीमुळे ठेकुआला छठ पूजेत प्रसादाचा मान दिला जातो. लग्नाच्या पंगतीतही ठेकुआने आपली जागा पटकावली आहे. नवी लग्न झालेली माहेरवाशीण घरी आल्यावर तिच्या सोबत सासरी घेऊन जायला ठेकुआ बनवला जातो. दहा ते पंधरा दिवस हा पदार्थ खराब होत नाही. त्यामुळे बऱ्याचदा दूरच्या प्रवासाला निघणाऱ्या व्यक्तीला ठेकुआ सोबत दिला जात असे.

ठेकुआचे पावित्र्य...

छठ हा बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशमध्ये साजरा केला जाणारा एक प्रमुख सण आहे. या दिवशी उगवत्या सूर्यासोबत मावळत्या सूर्याची पूजा केली जाते. त्यावेळी सूर्याला प्रसाद म्हणून ठेकुआ अर्पण केला जातो. या दरम्यान शेतात कापणी झालेली असते, गव्हाचे ताजे पीक निघालेले असते. या नव्या पिकापासून बनणारा पहिला पदार्थ ठेकुआ असतो आणि त्याचा पहिला घास नेहमीच सूर्यदेवाला अर्पण केला जातो. त्यामुळेच ठेकुआ बनवताना पावित्र्य जपण्याला फार महत्त्व दिले जाते. शेतातील गहू घरी स्वच्छ करून त्याला ऊन दाखवले जाते. पक्षी येऊन चोच मारू नयेत किंवा कोणाचाही हात लागू नये म्हणून त्याच्याभोवती जाळी किंवा मच्छरदाणी बांधली जाते. ऊन दाखवलेले गहू पाखडून, दळून पीठ घरी आणले जाते आणि ठेकुआ बनवायला सुरुवात होते. ठेकुआ बनवताना अनेक महिला मौनही धारण करतात. आपल्या बोलण्यामुळे मनात वाईट विचार येऊन ती नकारात्मक ऊर्जा पदार्थात उतरू नये म्हणून आपापसात बोलणे टाळले जाते. परंतु काळाच्या ओघात या प्रथा बदलत राहतात. आता अनेक ठिकाणी जवळच्या परिसरात राहणाऱ्या महिला एकत्र येऊन एक एक काम वाटून घेऊन, सणाची गाणी गात एकत्र ठेकुआ बनवतात.

नावाचा उगम...

ठेकुआ हा शब्द 'ठोकना' या क्रियापदावरून आलेला आहे, याचा अर्थ 'हातोडा मारणे' असा होतो. ठेकुआ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये पीठ लाकडाच्या साच्यावर जोरात दाबले जाते. या कृतीसाठी (ठोका हुआ) नाव देण्यात आले, या पदार्थाचा मूळ शब्द 'ठोकुआ' होता, काळाच्या ओघात त्याचा उच्चार 'ठेकुआ' असा बदलला.

ठेकुआचे सौंदर्य...

ठेकुआचे सौंदर्य जितके पदार्थाच्या चवीमध्ये आहे तितकेच त्याच्या आकारातही आहे. ठेकुआचे वैशिष्ट्य असे की तो लाटण्याने लाटला जात नाही तर पारंपरिक लाकडी साच्यावर थापला जातो. या लाकडी साच्यावर फुला -पानांच्या, उभ्या आडव्या रेषांच्या नक्षी आधीच कोरलेल्या असतात. या साच्यावर पीठ थापले की आपोआप ही सुंदर नक्षी त्या ठेकुआवर उतरते. गोल, अंडाकृती किंवा लांबट अशा वेगवेगळ्या आकारात हे ठेकुआ बनतात. गरमागरम तेलात सोडल्यानंतर सोनेरी रंगात हे नक्षीकाम अधिक खुलून दिसते.

ठेकुआची पाककृती

प्रत्येक घराप्रमाणे ठेकुआ बनवण्याची पद्धत बदलते,त्यामध्ये मिसळले जाणारे पदार्थ, त्याचे प्रमाण बदलते. पारंपरिक पद्धतीने ठेकुआ बनवण्याची पाककृती मात्र अगदी सोपी आहे.

साहित्य:

१ कप गव्हाचे पीठ
१-२ कप गूळ
१-४ कप खवलेले किंवा बारीक तुकडे केलेले खोबरं
१ टेबलस्पून साजूक तूप
१-२ टीस्पून बडीशेप
१-२ टीस्पून वेलची पूड
तळण्यासाठी तेल

कृती

१. कोमट पाण्यात गुळ विरघळवून पाक तयार करा आणि तो थंड करायला ठेवून द्या.
२. मोठ्या परातीत गव्हाचे पीठ, खोबऱ्याचे छोटे काप, बडीशेप आणि वेलची पूड एकत्र करा.
३. दोन चमचे साजूक तुपाचे मोहन पिठात घालून घ्या.
४. गुळाचा पाक पिठात मिसळून घट्ट पीठ मळून घ्या.
५. पिठाचे लहान लहान गोळे बनवा, त्यांना थोडे थापून गोलाकार करा, सुरीने त्यावर हलक्या हाताने उभ्या आडव्या रेघा ओढून डिझाइन तयार करा. (डिझाइनचे लाकडी साचे उपलब्ध असतात.)
६. गरम तेलात सोनेरी होईपर्यंत तळा.
७. गार झाल्यावर सर्व्ह करा.
दुसऱ्या दिवशी याची चव अजून खुलते!

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

आर्थिक राजधानीचे दरिद्री परिवहन

मुंबई देशाची आर्थिक राजधानी असल्याचे वारंवार सांगितले जाते. एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचा मोठा वाटा असतो यात काही शंका नाही. याशिवाय देशातील सर्वाधिक लोकसंख्येचे शहर म्हणूनसुद्धा मुंबईचाच विचार करावा लागतो. कमी जागेमध्ये मुंबईत होणारी लोकांची गर्दी आणि त्या तुलनेमध्ये सेवासुविधांचा असलेला अभाव तितक्या गांभीर्याने विचारात घेतला जात नाही. प्रामुख्याने मुंबईची परिवहन व्यवस्था किंवा एकूणच वाहतूक यंत्रणादेखील तुटपुंज्या ठरत आहेत. आज मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा ज्या परिस्थितीत चालवली जाते. त्यावरून सामान्य मुंबईकरांचे किती हाल होतात, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. याबरोबरच वाहतुकीची कोंडी ही मुंबईला कायमस्वरूपी भेडसावणारी समस्या आहे. अगदी सागरी मार्गाचे उद्घाटन होऊनही किंवा बरेच उड्डाणपूल होऊनही ही वाहतूक कोंडी कमी झालेली नाही. उपनगरीय रेल्वेवर पडणारा ताण वाहनांची सतत वाढणारी संख्या, अपुरी सार्वजनिक परिवहन सेवा, या सगळ्याला पर्याय म्हणून मेट्रो रेल्वेचे जाळे विस्तारण्याचा निर्णय घेतला गेला. प्रस्तावित सहा सात मार्गांपैकी तीन मार्ग सुरूही झालेले आहेत या तीनही मेट्रो मार्गांवर प्रवाशांची तुडुंब गर्दी असते. म्हणजे आवश्यकतेनुसार ज्या ज्या व्यवस्था नव्याने केल्या गेल्या त्या त्या अपुऱ्याच पडत गेल्या अशी आज मुंबईची स्थिती आहे. मग अगदी नऊ डब्यांच्याऐवजी बारा डब्यांच्या गाड्या सुरू झाल्या. काही ठिकाणी पंधरा डब्यांच्या गाड्यांचाही प्रयोग झाला. लोकांनी स्वतःची कार न वापरता आरामदायी अशा एसी लोकलचा वापर करावा, यासाठी याही गाड्यांचे प्रयोग सुरू झाले. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स ते गोरेगावच्या आरेपर्यंत भुयारी मेट्रो रेल्वेचा एक टप्पाही सुरू झाला. त्यालादेखील महिनाभरातच प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. जे जे नवे मार्ग सुरू झाले. किंवा पर्याय दिले गेले त्या सर्वांचा लोकांनी पुरेपूर वापर केलेला आहे तरीदेखील या व्यवस्था अपुऱ्या पडत असल्याचे दिसून येते .

आधुनिक सोयीसुविधा गरजेच्या

मेट्रो किंवा सागरी मार्गाच्या बांधकामानंतर उपनगरीय रेल्वे गाड्यांचा ताण कमी होईल अशी एक अपेक्षा ठेवली गेली. परंतु ती फारशी योग्य ठरत नाही. कारण पश्चिम उपनगरात मेट्रोचे दोन मोठे प्रकल्प सुरू झाले आणि एका भुयारी मेट्रोचाही प्रयोग सुरू झाला तरीदेखील उपनगरीय रेल्वेवरची गर्दी कमी झालेली नाही. पूर्व-उपनगरात लोकांना उपनगरीय रेल्वे आणि द्रुतगती मार्गाचाच वापर करावा लागतो. तिथे अजून मेट्रोचा एकही प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही. मध्य रेल्वेचा विस्तारही प्रचंड आहे. कारण कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल, इथपर्यंत धावणाऱ्या उपनगरीय गाड्या आणि प्रवाशांची वाढती संख्या याचा अजूनही मेळ बसत नाही. अगदी गेल्या सहा महिन्यात मध्य रेल्वेवर प्रवाशांचा खोळंबा होण्याचा म्हणजेच उपनगरीय मार्गांवर बिघाड होण्याच्या तब्बल २३०० घटना घडल्या. अगदी छोट्या छोट्या तांत्रिक बिघाडांमुळे गाड्या उशिरा धावणे आणि खोळंबलेल्या गाड्यांचा नाद सोडून इतर पर्यायी गाड्यांचा वापर करण्याची वेळ अनेकवेळेला लोकांवर आलेली आहे. हे तांत्रिक स्वरूपाचे बिघाड कशामुळे होत आहे किंवा त्याचे वाढलेले प्रमाण लक्षात घेता मध्य रेल्वेच्या कार्यक्षमतेतच घट झाली असे म्हणण्याची वेळ येते. देशाची आर्थिक राजधानी असूनही मुंबईची एकूणच परिवहन व्यवस्था इतक्या दरिद्री स्वरूपाची का असावी, हे कोडे अजून तरी कोणाला उलगडलेले नाही. याचा सरळ अर्थ एवढाच होतो की लोकसंख्येचे वाढते प्रमाण लक्षात घेतले गेले नाही. आणि त्याप्रमाणात परिवहन सोयीसुविधांची पूर्तता केली गेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. मुंबईत आज ज्या मेट्रो सेवेला सुरूवात होते आहे. ती सुविधा वीस वर्षापूर्वीच मुंबईकरांना मिळायला हवी होती. त्यावेळीसुद्धा मुंबई ही देशाची आर्थिक राजधानीच होती. लोकसंख्याही त्यावेळेला सर्वाधिक होती. परंतु त्यावेळच्या केंद्र सरकारने दिल्लीला मेट्रो करायला प्राधान्य दिले. म्हणजे देशाच्या राजधानीला आवश्यकता नसताना मेट्रोची सुविधा दिली गेली. पण देशाची आर्थिक राजधानी आणि मोठी लोकसंख्या असूनही मुंबईला ताटकळत ठेवले गेले.

योग्यवेळी योग्य सुविधा नाहीत

गेल्या महिन्यात बीकेसी ते आरे अशी भुयारी मेट्रो सुरू झाली आणि महिनाभरात तब्बल साडेसहा लाख प्रवाशांनी त्याचा फायदा घेतला. नऊ डब्यांची ही मेट्रो दिवसभरातून नव्वद फेऱ्या मारते आणि साधारणपणे एका फेरीमध्ये अडीच हजार प्रवाशांची ने-आण करते. म्हणजे सुविधा दिल्यानंतर त्याला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेतला तर अशा सुविधेची किती निकड होती हे त्यातून स्पष्ट होते. तोच प्रकार मेट्रो सेवांचाही आहे. अशा प्रकारच्या उपनगरीय रेल्वेच्या सोयीसुविधा जर वीस वर्षांपूर्वीच वाढवल्या गेल्या असत्या तर कितीतरी जणांचे प्राणही वाचू शकले असते आणि मुंबईकरांची वाया जाणारी शक्ती आणि पैसाही वाचला असता. त्यांच्या कार्यक्षमतेचा अधिक वापर होऊ शकला असता. लोकलमधल्या गर्दीमुळे किंवा एकूणच घाईगर्दीमुळे मुंबईच्या उपनगरीय मार्गांवर रोज चार पाच जणांचे बळी जात असतात. पूर्वीपेक्षा हे प्रमाण कमी झाले आहे. याचा अर्थ योग्यवेळी योग्य प्रकारच्या सोयीसुविधा न दिल्याने लोकांचे हकनाक बळी तर गेले आहेतच. परंतु त्यांना विनाकारण परिश्रम करायला भाग पाडले जाते. प्रत्यक्ष कामापेक्षा कामावर पोहचण्यासाठीच त्यांच्या शक्तीचा मोठा अपव्यय होत असतो. मुंबईतला उद्योग व्यवसाय मोठ्या प्रमाणावरचा रोजगार या सर्वांचा विचार केला तर अत्याधुनिक स्वरूपाच्या परिवहन व्यवस्थेची मुंबईला अत्यंत आवश्यकता आहे. देशाचा आर्थिक भार वाहून नेणाऱ्या मुंबईच्या परिवहन सेवेचा भार मात्र कोणीही वाहून न्यायला तयार नाही. रखडलेले मेट्रो प्रकल्पसुद्धा खूप वेगाने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आपला अगदी लहान विवेकी निर्णय आपले आयुष्य बदलू शकतो आणि अविवेकी निर्णय आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो.

पंचांग

रविवार, १० नोव्हेंबर, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर

कार्तिक शुक्ल नवमी
नक्षत्र : धनिष्ठा

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कुंभ

रवी उदय- ०६-४४
रवी अस्त- १८-००

कुष्मांड नवमी, (कोहळा दान करावा)

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
REGD. No. MAHMAR/2021/81075

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

पाककृती

मशरूम आणि कॉर्न सूप

- ★ **साहित्य -** १/२ कप मशरूम उभे चिरून, ३/४ कप स्विट कॉर्न, १/२ कप कांदा बारीक उभा चिरून, १ हिरवी मिरची, मिरपूड, १ तमालपत्र, (लवंग, दालचिनी आणि जायफळ याचे)गार्लिक पावडर किंवा १/४ चमचा लसूण पेस्ट, ३ टेबलस्पून दूध, १/२ कप पाणी, १/२ चमचा बटर, चवीपुरते मीठ,
- ★ **कृती -** १) मध्यम आचेवर पातेल्यात बटर घालावे. बटर वितळल्यावर त्यात आणि तमालपत्र घालावे. थोडेसे परतून त्यात कांदा घालावा. २) कांदा परतल्यावर त्यात मशरूम घालावे. दोन तीन मिनिटे परतून त्यात स्विट कॉर्न घालावे आणि १/२ कप पाणी घालून एक उकळी काढावी. नंतर त्यातील आणि तमालपत्र काढून टाकावे. नाहीतर सूप उग्र होते. ३) मीठ आणि गार्लिक पावडर घालून उकळी काढावी. मंद गॅसवर ढवळत असताना दूध घालावे. १ मिनिटानंतर हिरवी मिरची बारीक चिरून घालावी. सर्व्ह करताना वरून चिमूटभर मिरपूड घालावी.

मुंबईच्या संघाची दमदार कामगिरी
ओडिसा १ डाव आणि १०३ धावांनी पराभूत

गतविजेत्या मुंबईने शनिवारी रणजी क्रिकेट स्पर्धेतील एलिट गटाच्या सामन्यात ओडिसाचा एक डाव आणि १०३ धावांनी पराभव केला. या विजयात मुंबईसाठी फिरकीपटू शम्स मुलाणी (५ गडी) आणि हिमांशू सिंग (४ गडी) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यातील शानदार कामगिरीसाठी शम्स मुलाणीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने या सामन्यात एकूण ११ विकेट्स घेतल्या.

■ मुंबई

या सामन्यात ओडिशा संघाने नाणेफेक जिंकून मुंबईला फलंदाजी करण्यास आमंत्रित केले होते. मुंबईने १९ धावांवर पहिली विकेट गमावली. आयुष म्हात्रे १८ धावा करून बाद झाला. यानंतर मुंबईने १५४ धावांवर सलग २ विकेट्स गमावल्या. अंगकृष्ण रघुवंशी ९२ आणि अजिंक्य रहाणे शून्यावर बाद झाले. यानंतर श्रेयस अय्यर आणि सिद्धेश लाड यांनी चौथ्या विकेटसाठी विक्रमी भागीदारी केली. दोघांनी ३५४ धावांची भागीदारी केली. ही जोडी हर्षित राठोडने तोडली. श्रेयस अय्यरने २२८ चेंडूत २४ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने २३३ धावा केल्या. सिद्धेश लाड आणि सूर्यांश शेंडगे या दोघांनी पाचव्या विकेटसाठी ९४ धावांची नाबाद भागीदारी केली. यानंतर ४ बाद ६०२ धावांवर कर्णधार अजिंक्य रहाणेने डाव घोषित केला. सिद्धेशने ३३७ चेंडूत १७ चौकारांच्या मदतीने नाबाद १६९ धावा केल्या. सूर्यांश शेडगेने ३६ चेंडूत ७९ धावा केल्या. अजिंक्य रहाणेने फॉलोऑन दिल्यानंतर ओडिशाचा संघ दुसऱ्या डावात २१४ धावांत गारद झाला. पहिल्या डावात त्याला केवळ २८५ धावा करता आल्या. शेवटच्या दिवशी ५ बाद १२६ धावांवर खेळत असताना मुलानीने अर्धशतक पूर्ण केल्यानंतर लगेचच यष्टीरक्षक फलंदाज आशीर्वाद स्वेन (५१) याला बाद केल्याने ओडिशाच्या आशा मावळल्या.

भारतीय अ संघाचा दारुण पराभव
ऑस्ट्रेलिया अ संघाने मालिका जिंकली

■ मेलबर्न

ऑस्ट्रेलिया अ संघाने दुसऱ्या कसोटी सामन्यात ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारतीय अ संघावर ६ गडी राखून विजय मिळवला. यासह ऑस्ट्रेलिया अ संघाने भारतीय अ संघाचा २-० असा व्हाईटवॉश केला. भारतीय अ संघाला पहिल्या कसोटीत ७ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला होता.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय अ संघाने पहिल्या डावात १६१ धावा केल्या होत्या. ध्रुव जुरेलने पहिल्या डावातही अर्धशतक झळकावले होते. त्याने ८० धावांची शानदार खेळी केली होती. या धावसंख्येला उत्तर देताना ऑस्ट्रेलिया अ संघाने पहिल्या डावात २२३ धावा केल्या आणि ६२ धावांची आघाडी घेतली होती. भारतीय अ संघाने दुसर्या डावात २२९ धावा करत ऑस्ट्रेलिया अ संघासमोर विजयासाठी १६८ धावांचे लक्ष्य ठेवले. या धावसंख्येचा बचाव करताना भारत अ संघाने चांगली सुरुवात केली होती. वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने डावाच्या पहिल्याच षटकात मार्कस हॅरिस आणि कॅमेरून बॅनक्रॉफ्ट यांना बाद करून भारताला झटपट बळी मिळवून दिले. यानंतर मुकेश कुमारने ऑस्ट्रेलियन कर्णधार नॅथन मॅकस्विनी आणि तनुष कोटियनने ऑलिव्हर डेव्हिसला बाद करून भारताला आणखी दोन यश मिळवून दिले. मात्र, त्यानंतर भारतीय गोलंदाजांना एकही विकेट घेता आली नाही. परिणामी ऑस्ट्रेलिया अ संघाने भारतीय अ संघावर ६ गडी राखून विजय मिळवला.

कसोटीतील पराभवानंतर बीसीसीआयची ६ तास बैठक

■ मुंबई

न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेतील पराभवानंतर बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट संघ व्यवस्थापन यांच्यात सहा तास बैठक झाला. मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात झालेल्या या बैठकीत पराभवाच्या कारणांवर चर्चा करण्यात आली आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवर व्यवस्थापनाकडून उत्तरे मागितली. कर्णधार रोहित शर्मा, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर, बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी आणि सचिव जय शहा यांच्यासमोर हजर झाले. त्यासोबत प्रशिक्षक गौतम गंभीर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सामील झाला.

विंडिज संघाची घोषणा

■ त्रिनिदाद

वेस्ट इंडिज विरुद्ध इंग्लंड यांच्यात १० नोव्हेंबरपासून टी-२० मालिका सुरू होणार आहे.या मालिकेसाठी वेस्ट इंडिजच्या संघाची घोषणा केली. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेसाठी अनुपलब्ध असलेले निकोलस पूरन, शिमरॉन हेटमायर, आंद्रे रसेल आणि अकील हुसेन यांची इंग्लंडविरुद्ध पहिल्या २ टी-२० सामन्यांसाठी वेस्ट इंडिजच्या संघात निवड केली. वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफच्या जागी मॅथ्यू फोर्डचा संघात समावेश करण्यात आला आहे. मागील सामन्यांमध्ये झालेल्या वादामुळे अल्झारी जोसेफवर २ सामन्यांची बंदी घालण्यात आली.

संजू सॅमसन चमकला! ५ विक्रम मोडले

■ डरबन

भारतविरूद्ध दक्षिण आफ्रिका संघात झालेल्या ४ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ६१ धावांनी शानदार विजय मिळवला. या सामन्यात संजू सॅमसनने शानदार शतक झळकावत ५ विक्रम आपल्या नावावर केले.

दक्षिण आफ्रिकेविरूद्ध शतक झळकावणारा तो पहिला भारतीय यष्टीरक्षक ठरला आहे. यासह तो दक्षिण आफ्रिकेविरूद्ध सर्वात जलद शतक ठोकणारा भारतीय फलंदाज बनला. त्याने एका डावात सर्वाधिक १० षटकार ठोकले. सॅमसन आता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० सामन्यात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने डेव्हिड मिलरचा विक्रम मोडला आहे. सॅमसन आता सलग २ टी२० सामन्यांत शतके झळकावणारा पहिला भारतीय ठरला आहे.

अंडर-१९ आशिया क्रिकेट चषकाचे वेळापत्रक जाहीर

■ अबू धाबी

आशियाई क्रिकेट परिषदेने अंडर-१९ आशिया क्रिकेट चषकाचे वेळापत्रक जाहीर केले. ही स्पर्धा २९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबरदरम्यान युएईमध्ये आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेत भारतविरूद्ध पाकिस्तान संघात सामना ३० नोव्हेंबर रोजी होणार आहेत. या स्पर्धेत ८ संघ सहभागी होणार असून त्यामध्ये भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, जपान आणि युएई या संघांचा समावेश आहे. या ८ संघांची २ गटांत विभागणी केली असून एका गटात ४ संघ आहेत. पाकिस्तान, यूएई, जपान आणि भारत या संघांना अ गटात ठेवण्यात आले आहे, तर बांगलादेश, अफगाणिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका या संघांना ब गटात ठेवण्यात आले आहे. ३० नोव्हेंबरला दुसऱ्या सामन्यात भारत-पाकिस्तान भिडणार आहेत.

परेलमध्ये आज बुध्दिबळ स्पर्धा

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी ग्रुपतर्फे लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत शंभराव्या बुध्दिबळ स्पर्धेचे उद्या परेल येथील आरएमएमएस वातानुकुलीन सभागृहात आयोजन करण्यात येणार आहे. प्रतिवर्षाप्रमाणे बालदिनानिमित्त ७, ८, ९, १०, ११, १२, १३ आणि १४ वर्षांखालील मुलामुलींच्या ८ वयोगटाची एलआयसी-आयडियल कप शतक महोत्सवी बुध्दिबळ स्पर्धा स्विस लीग पध्दतीने रंगणार आहे. आरएमएमएस, मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना व को-ऑपरेटिव्ह एम्प्लॉईज युनियन (मुंबई)सहकार्याने होणाऱ्या स्पर्धेतील विजेत्या-उपविजेत्यांना १२० पुरस्कार दिले जाणार आहेत. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी यांच्याकडे संपर्क साधावा.

स्पोर्टींग क्लब कमिटीचा संघ उपांत्य फेरीत दाखल

■ ठाणे

पहिल्या डावातील अवघ्या १४ धावांच्या आघाडीच्या जोरावर यजमान स्पोर्टींग क्लब कमिटीने रॉयल क्रिकेट क्लबला मत देत १४ वर्ष वयोगटाच्या दोन दिवसीय शताब्दी चषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले. रॉयल क्रिकेट क्लबला पहिल्या डावात २७६ धावांवर रोखल्यावर यजमानांनी पहिल्या डावात २९० धावसंख्या उभारत पहिल्या डावात आघाडी मिळवली होती. या आघाडीने स्पोर्टींग क्लब कमिटीला उपांत्य फेरीत खेळण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

प्रथम फलंदाजी करताना म्रिदेवनाथच्या नाबाद १२६ धावांच्या जोरावर रॉयल क्रिकेट क्लबने २७६ धाव उभारल्या. या सामन्यातही

आपल्या गोलंदाजीची छाप पाडताना अर्णव वाणी आणि आर्यन राजने प्रत्येकी चार बळी मिळवले. या धावसंख्येला उत्तर देताना हर्षित बोबडे आणि विहान अस्वलेने अर्धशतकी खेळी करत संघाला आघाडी मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले. पहिल्या सामन्यात शतकाला मुकलेल्या विहानला या सामन्यातही शतकाने हुलकावणी दिली. विहानने यावेळी ९० धावा केल्या. हर्षितने ७३ धावांची एकूण धावसंख्येत भर टाकली. तन्मयनं मालुसरेने ३६ धावा केल्या. रॉयलच्या नीर जैनने चार फलंदाज बाद केले. दुसऱ्या दिवसाचा खेळ सापळा तेव्हा रयल क्रिकेट क्लबने दुसऱ्या डावात १ बाद ८२ धावा अशी मजल मारली होती.

संक्षिप्त धावफलक : उपांत्यपूर्व फेरी : रॉयल क्रिकेट क्लब : पहिला डाव :९२.२ षटकात सर्वबाद २७६ (म्रिदेवनाथ नाबाद १२६, अर्णव वाणी २१.२-७-५०-४, आर्यन राज १५-३- ४५-४), दुसरा डाव : १ बाद ८२. विरुद्ध स्पोर्टींग क्लब कमिटी :७८ षटकात सर्वबाद २९० (हर्षित बोबडे ७३, विहान अस्वले ९०, तन्मय मालुसरे ३६, नीर जैन २०-६-६३-४). पहिल्या डावातील १४ धावांच्या आघाडीमुळे स्पोर्टींग क्रिकेट क्लब विजयी.

सुख शांती समाधान

सध्या कार्तिक महिना हा पवित्र महिना सुरू झाला आहे. हा महिना भगवान विष्णुंचा आवडता महिना होय. या महिन्यात काही उपाय केल्यास श्री भगवान विष्णु तुम्हाला सर्व समस्यांपासून मुक्त करेल. अशा परिस्थितीत जर तुमचे जीवन अनेक समस्यांनी घेरले असेल तर या पवित्र महिन्यात हे उपाय अवश्य करून पहा. या महिन्यात पूजा आणि नदी पात्रात स्नान केल्याने अक्षय फळ मिळते. पुराणात असे सांगितले आहे की, कार्तिक महिन्यात घराबाहेरील पवित्र नदीत स्नान करून, गायत्रीचा जप आणि दिवसातून एकदाच अन्न खाल्ल्यास मनुष्याला शुभ फल प्राप्त होते आणि प्रगती होते. याशिवाय कार्तिक महिन्यात तुळशीच्या पानांनी भगवान विष्णूची पूजा केल्याने भगवान विष्णू खूप प्रसन्न होतात. कार्तिक महिन्यात संध्याकाळी तुळशीच्या रोपाजवळ तुपाचा दिवा लावावा. यामुळे घरातील सुख-समृद्धी टिकून राहते. हा महिना पुढील प्रमाणे साजरा करावा.

कार्तिक महिन्यात हे उपाय करा...

हिंदू धर्मात दिवा लावण्याचे खूप महत्त्व आहे. प्रत्येक घरात सकाळ संध्याकाळ पूजेच्या खोलीत दिवा लावण्याची परंपरा आहे. यासोबतच तुळशीच्या चौकात आणि घराच्या दारात दिवा लावणे देखील शुभ मानले जाते. असे मानले जाते की दिवा लावणे खूप शुभ असते आणि यामुळे धनाची देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि तिच्या कृपेने घरात सुख-समृद्धी वाढते. दिवा लावल्याने नकारात्मकताही दूर होते. मात्र, दिवा योग्य पद्धतीने लावणे महत्त्वाचे असून त्यासाठी काही नियम आहेत.

दिवा लावताना दिशेकडे लक्ष द्या, त्याची योग्य दिशा लक्षात ठेवावी. दिव्याची दिशा चुकीची राहिल्याने फायद्याऐवजी नुकसान होऊ शकते. मंदिराजवळील दिवा नेहमी पश्चिम दिशेला ठेवावा. या दिशेला जळणारा दिवा आपल्या उजव्या हाताला लावत असेल तर या गोष्टी लक्षात ठेवा. देवाला दाखवलेल्या दिव्यात नेहमी तुपाचा दिवा आणि डाव्या हाताला तेलाचा दिवा लावावा.

कापसाची वात शुभ मानली जाते. वात चुकूनही दक्षिणेकडे ठेवू नये, तुटलेला दिवा नेहमी अखंड लावावा. तुटणे शुभ मानले जात नाही.

पूजेच्या वेळी दिव्यामध्ये पुरेसे तूप टाकावे जेणेकरून ते विझणार नाही. पूजेच्या मध्यभागी दिवा विझवणे शुभ मानले जात नाही. यावेळी एकामागून एक दिवा लावू नयेत.

सकाळी ५ ते १० या वेळेत दिवा लावणे शुभ मानले जाते, तर संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत दिवा लावल्याने सकारात्मक परिणाम मिळतात.

जर तुम्हाला चांगले करिअर करायचे असेल किंवा तुमचा व्यवसाय वाढवायचा असेल तर कार्तिक महिन्यात मंदिरात तुपाचे दान करा आणि देवासमोर हात जोडून प्रार्थना करा. जर तुम्हाला तुमच्या जीवनात प्रगती करायची असेल तर संपूर्ण कार्तिक महिन्यात विष्णू मंदिरात जा आणि तुपाचा दिवा लावा. तसेच या मंत्राचा ११ वेळा जप करा.

मंत्र आहे- **ओम नमो भगवते नारायणाय।।**

लग्न होण्यात अडथळे येत असतील तर कार्तिक महिन्यात स्नान वगैरे करून तुळशीला पाणी अर्पण करून हात जोडून आशीर्वाद घ्यावा. तसेच भगवान विष्णूला पिवळी फुले अर्पण करा.

जर तुम्हाला तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद आणायचा असेल तर कार्तिक महिन्यात तुळशीच्या रोपाभोवती चार केळीच्या पानांनी सुंदर मंडप तयार करा. तुळशीला लाल चुनरी अर्पण करा. तसेच बांगड्या, टीकली, मेंहदी, कुंकू, जोडव्या इत्यादी लग्नाचे साहित्य अर्पण करा. नंतर पाणी, अक्षता, कुंकू आणि हळदीने भगवान विष्णूची पूजा करून बत्तासे अर्पण करावे. तसेच तुपाचा दिवा लावा.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विजय म्हणजेच विजयश्री मिळवायची असेल, तर कार्तिक महिन्यात स्नान वगैरे झाल्यावर भगवान विष्णूला चंदनाचा टीळा लावावा. ताजी पिवळी फुले देखील अर्पण करा.

जर तुमची किंवा तुमच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याची तब्येत ठीक नसेल, तर कार्तिक महिन्यात स्नान करून, तुळशीच्या रोपाखाली तुपाचा दिवा लावावा आणि 'ॐ नमो भगवते नारायणाय'चा ५ वेळा जप करावा.

जर तुमच्या जोडीदाराची वागणूक तुमच्याशी चांगली नसेल, त्यामुळे तुमचे संबंध चांगले नसतील तर कार्तिक महिन्यात तुळशीच्या रोपाची सेवा करा. तुळशीच्या रोपाला रोज पाणी द्या आणि त्याची काळजी घ्या. तसेच तुळशीचा परिसर स्वच्छ ठेवा.

जर तुम्हाला तुमच्या व्यवसायात नफा वाढवायचा असेल तर कार्तिक महिन्यात पाण्यात थोडे गंगाजल टाकून स्नान करा. तसेच भगवान विष्णूसमोर तुपाचा दिवा लावा. तसेच त्यांना बेसन लाडू अर्पण करा आणि प्रसाद म्हणून लगेचच ते लाडू कुटुंबातील

सर्व सदस्यांना प्रसाद म्हणून द्या आणि स्वतः सुद्धा थोडा प्रसाद घ्या.

जर तुम्हाला तुमच्या घरात सुख, समृद्धी यायची असेल तर संपूर्ण कार्तिक महिन्यात भगवान श्री विष्णूची विधिवत पूजा करा आणि श्री विष्णूजींच्या मंत्राचा १०८ वेळा जप करा.

मंत्र आहे- ओम नमो भगवते नारायणाय।

जर तुम्हाला तुमची आर्थिक स्थिती मजबूत करायची असेल तर कार्तिक महिन्यात स्नान वगैरे करून तुळशीच्या रोपाला तसेच केळीच्या रोपाला पाणी अर्पण करावे. तसेच तुळशीच्या रोपाच्या देठावर हळदीची पेस्ट लावा.

जर तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असेल तर कार्तिक महिन्यात आंघोळ वगैरे झाल्यावर तुळशीच्या रोपाला नमस्कार करा आणि तुळशीच्या पानांचे सेवन करा. लक्षात ठेवा तुळशीची पाने चावू नयेत, ती फक्त पाण्याने गिळली पाहिजेत.

जर तुम्हाला तुमच्या वैवाहिक जीवनात काही अडचणी येत असतील तर पाच गोमती चक्रे आणि एक हळकुंड घेऊन त्यांची मंदिरात स्थापना करा आणि कार्तिक महिन्यात दररोज अगरबत्ती, दिवे, फुले इत्यादींनी त्यांची पूजा करा. तसेच तुमच्या वैवाहिक जीवनातील अडचणी दूर होण्यासाठी देवाला प्रार्थना करा.

कार्तिक महिना संपल्यानंतर ते गोमती चक्र उचलून पिवळ्या रंगाच्या कापडामध्ये बांधून सोबत ठेवा आणि हळद वापरा.

***

कार्तिक पौर्णिमेला हे करा....

कार्तिक शुक्ल पक्षातील पौर्णिमेच्या दिवशी भगवान विष्णुंच्या पूजेचे महत्त्व अधिक वाढते. या दिवशी भाविक कार्तिक पौर्णिमेचा उपवास करतात. कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरी किंवा त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी देव दीपावलीचा सणही मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. हिंदू कॅलेंडरनुसार, यावर्षी कार्तिक पौर्णिमा व्रत १५ नोव्हेंबर रोजी पाळण्यात येणार आहे. ही तिथी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची कृपा प्राप्त करण्यासाठी शुभ मानली जाते. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी पवित्र नदीत स्नान आणि पूजा केल्याने व्यक्तीचे सर्व संकट दूर होतात, अशी धार्मिक मान्यता आहे.

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी पूजा आणि दान केल्याने भगवान विष्णू प्रसन्न होतात असे शास्त्रात सांगितले आहे. या दिवसाच्या निमित्ताने काही नियम सांगण्यात आले आहेत, जे भक्तांनी पाळल्यास देवी लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांची कृपा भक्तांवर कायम राहते.

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी सकाळी लवकर उठावे. घराची स्वच्छता करून सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करावे, भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा करावी, भगवान विष्णूला सुगंधी फुले, फळे आणि वस्त्रे अर्पण करावी.

तसेच शुद्ध गायीच्या तुपाचा दिवा लावावा आणि आरती करावी.

तसेच दिवसभर उपावास करावा व भगवान विष्णूच्या मंत्रांचा जप करावा.

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तामसिक भोजन टाळावे, कोणतेही व्यसन या दिवशी करू नये. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ब्रह्मचर्य अवश्य पाळावे. तसेच जमिनीवर झोपण्याचा प्रयत्न करा. असे न केल्याने चंद्र देवाचा राग येईल. या दिवशी कोणत्याही वादाचा भाग बनू नका. तसेच या दिवशी कोणत्याही असहाय, वृद्ध, गरीब व्यक्तीसाठी अपशब्द वापरू नका. या विशेष प्रसंगी दान केल्याने भक्तांना विशेष लाभ होतो. त्यामुळे या दिवशी गरजू व्यक्तीला अन्न किंवा पैसे दान करा. असे केल्याने व्यक्ती पुण्यात वाढ होते.

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी देव-दिवाळी साजरी केली जाते. या दिवशी दिवे दान करा. असे केल्याने अनेक समस्या दूर होतील. यासोबत कार्तिक पौर्णिमेच्या व्रताच्या दिवशी सायंकाळच्या पूजेच्या वेळी महालक्ष्मी स्तुतीचा पाठ करा. असे केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि आपला आशीर्वाद नेहमी भक्तांवर ठेवते.

सदाशिव पेठेतील प्रसिध्द न्यू पूना बोर्डींग हाऊस

आज पुण्यातील सदाशिव पेठेतील प्रसिध्द न्यू पूना बोर्डींग हाऊसचे शंभराव्या वर्षात पदार्पण झाले. ५ नोव्हेंबर १९२५ ते ५ नोव्हेंबर २०२४ असा न्यू पूना बोर्डींग हाऊसचा नव्याणव वर्षांचा अथक प्रवास आज पुर्ण होऊन शतकाच्या वर्षात जात आहे. शतकपूर्तीच्या दिशेने जाताना त्यांना असंख्य ग्राहकांचे, पुरवठादारांचे, कामगारांचे सहकार्य लाभले. अतिशय स्वच्छ जागेत सात्विक जेवण आणि आपुलकीची वागणूक हे पूना बोर्डींग वैशिष्ट्य त्यांनी गेली अनेक वर्ष सातत्याने जपलं आहे. पुण्यातला प्रसिद्ध डायनिंग हॉल न्यू पूना बोर्डींग हाऊची सुरुवात पुण्याच्या सदाशिव पेठेत ५ नोव्हेंबर १९२५ (दिवाळी पाडवा) रोजी झाली. येथे घरगुती पद्धतीचे शाकाहारी जेवण थाळी पद्धतीने मिळते. काही शे लोक येथे दररोज सकाळी-संध्याकाळी जेवून जातात. पूना बोर्डिंग म्हणजे, पुण्यात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायला आलेल्या मुलांसाठी चालवलेली 'मेस' नाही. खरतर 'डेली मेस' ऊर्फ खानावळीचा व्यवसाय सोडून रोजच्या थाळीचा व्यवसाय करायला सुरुवात करुनही पूना बोर्डिंगला आता ३५ हून अधिक वर्ष होऊन गेली.

पुना गेस्ट हाऊस
महाराष्ट्रीयन भोजन
थालीपीठ लोणी दडपे पोहे
पुणेरी स्पे. मिसळ
अस्सल महाराष्ट्रीयन पदार्थ
पूना गेस्ट हाऊस
मानस
न्यू पूना बोर्डिंग हाऊस
भोजनाची वेळ
सकाळी-११-३० ते ३-०० रात्री ७-३० ते १०-००
साप्ताहिक सुट्टी दर शुक्रवारी

पूना बोर्डिंगची सुरुवात खानावळ स्वरूपात झाली, त्याची सुरुवात केली कर्नाटकातून आलेल्या सुहास उडपीकर यांचे आजोबा गुरुराज ऊर्फ मणीआप्पा उडपीकर यांनी. मणीआप्पांनी कर्नाटकी वैष्णव ब्राह्मणी चवीचा स्वयंपाक पुण्यात बनवणं सुरु केलं. मणीआप्पांनी पेरुगेटाजवळ सध्याच्या जागेच्या पलिकडे खालच्या मजल्यावर 'पूना बोर्डिंग' ही वैष्णवी खानावळ सुरू केली. सोवळ्यात केलेला स्वयंपाक, पाटावर बसून पंगतीत बसून जेवायला, त्याकाळी ज्येष्ठ गायक भारतरत्न भिमसेन जोशी यांच्यासारखे कलाकार,लेखक, पत्रकार,अधिकारी असे अनेक दिग्गज जमेल तेव्हा आवर्जून हजेरी लावायचे.

महिन्याचे पैसे घेऊन मोजके जेवण वाढण्याच्या खानावळ व्यवसाय करतानाही, मणीआप्पा आणि त्यानंतर त्यांचे पुत्र आण्णा उडपीकर ह्यांनी आपल्या उत्कृष्ट जेवणाच्या आणि दिलदारपणे वाढण्याच्या स्वभावाच्या जीवावर अक्षरशः हजारो माणसं जोडली. घरापासून लांब राहून इथे घरच्यासारखे जेवायला येऊन पुढे नामवंत डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट, बँकर, उद्योजक आणि खेळाडू झालेले त्याकाळातले शेकडो विद्यार्थी (आणि आताचे बुजुर्ग) आजही याची साक्ष देतात. ह्याच उत्तम चवीच्या आणि दर्जेदार खाण्याच्या जीवावर,आता रहायला बरेच लांब गेले असूनही अनेक आजी आजोबा इथे गेले अनेक वर्ष,आवडीने जेवायला येतायत. त्याच बरोबर हिंजवडी,मुंढव्यात असलेल्या आयटी कंपनीत नोकरी करुन, रोज रात्री इथे जेवायला येणारी 'कपल्स' ही इथे बघायला मिळतील. साधारण ३-४ पिढ्या एकाचवेळी जेवायला येण्याचं भाग्य फार मोठंय.

१९७७ साली आता आहे त्या जागी पूना बोर्डिंग नव्याने सुरु झालं.१९८० च्या सुरुवातीला, पूना बोर्डिंगनी 'मंथली मेस' हा प्रकार बंद करुन लिमिटेड थाळी पद्धतीने जेवण द्यायला सुरुवात केली. बऱ्याच जणांच्या बाबतीत ती नावालाच लिमिटेड रहाते ते सोडा ! येथे उडपीकर कुटुंबीयांची तिसरी पिढी सुहास उडपीकर यांच्या वेगळ्याच आतिथ्याचा अनुभव मिळतो.

इथली एक खासियत म्हणजे पूना बोर्डिंगमधे रोज शेकडो लोक जेवून जातात पण इथे सर्वात आधी जेवण होतं ते इथल्या सगळ्या स्टाफचं !

बोर्डिंगसाठी केलेला स्वयंपाक ते सुरु व्हायच्या आधी साडेदहा - अकराच्या सुमारास सगळा स्टाफ पोटभर जेवतो. त्यानंतरच येणाऱ्या लोकांकरता इथले दरवाजे उघडले जातात.

बोर्डिंग बंद होताना मालक सुहास उडपीकर इथेच जेवतात हे इथले वेगळेपण आहे. आणि स्वतः मालक ही इथेच जेवतात छाप पाटी तर नाहीच नाही. लिमिटेड थाळी असूनही आजकाल मुलं जेवत नाहीत म्हणून हॉस्टेलवर रहाणाऱ्या मुलामुलींसाठी कमी पैश्यात दोन पोळ्या आणि हाफ प्लेट भाजीही इथून पार्सल होतात. पण सुहास उडपीकरांचा खरा आग्रह लोकांनी इथे येऊन मनापासून जेवावं हा असतो. म्हणून आजही बिटाची कोशिंबीर, गुरुवारी रात्री असलेली मुगाची खिचडी, कढी व दर रविवारचा मेन्यु मसालेभात आणि अळूची भाजी खायला इथे येणारी ग्राहकांची रांग, पार खालच्या मजल्यापर्यंत पोचते.

आज ही न्यू पूना बोर्डींग हाऊस ला गेल्यावर तेच सात्विक जेवण, शुद्ध भाषा, स्वच्छता, आणि पुणेरी जेवणाचा तिथल्या वातावरणातील दरवळलेला सुवास याची जाणीव होते. आजही सर्वांना नावाने हाक मारून जागा दिल्या जातात. आणि दोन घास खाणारा चार घास खाऊन, तृप्त होऊन जातो हे नक्कीच...

शंभरीच्या उंबरठ्यावर असलेल्या 'पूना बोर्डिंग' येवढी जुनी आणि अजूनही तितक्याच जोरात सुरु असलेली पुणेरी मराठी शाकाहारी थाळी पुण्यात तरी दुसरी नसावी. ही शंभरी आणि त्यानंतरची त्यांची इनिंग अशीच बहरत जावो,ही एक खवैय्या पुणेकराकडून मनोमन प्रार्थना!

सुहास उडपीकर- ९८२२०४३०२३.

पूना बोर्डिंग पत्ता: पेरुगेट चौक, पोलीस चौकीसमोर, सदाशिव पेठ, पुणे ३०.

आपला तो बाब्या,दुसऱ्याचे ते कारटे वैभव नाईक यांची राणेंवर टीका

सिंधुदुर्ग - आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते कारटे राणेंना बरोबर लागू होते, असे म्हणत कुडाळ-मालवण मतदारसंघाचे ठाकरे गटाचे उमेदवार वैभव नाईकांनी राणेंवर निशाणा साधला. नाईक म्हणाले की, निलेश राणे हा नारायण राणेंचा मुलगा आहे. त्यामुळे त्यांना सरस वाटतो. पण खासदार असताना त्यांच्या मुलाने काय दिवे लावले? सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकांना उद्धव ठाकरे यांच्याबाबत आत्मीयता आहे. याला येऊ देणार नाही त्याला येऊ देणार नाही, ही राणेंची नेहमीची प्रवृत्ती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला, तेव्हा राणेंचे तोंड कोणी धरले होते?

महायुतीने राज्याला लुटले नाना पटोले यांचा आरोप

■ जालना

विकासाचे गाजर दाखवून राज्यात सत्तेत आलेल्या महायुतीतील मंडळींनी केवळ राज्याला लुटण्याचे काम केले असून राज्यातील प्रमुख उद्योग गुजरातला नेणाऱ्या महायुती सरकारला जनता घरचा रस्ता दाखवेल, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. ते आज जालना विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारसभेत बोलत होते.

जाहिरात

मे. मोहन बिअर आणि वाईन शॉप, नमुना एफएलबिआर - २ अनु. क्र. ७५, शॉप नं.६ मालवणी महालक्ष्मी को. ऑप हौ.सो.प्लॉट नं. ५९, आरएससी- ६ म्हाडा, लेआउट, मालाड (प), मुंबई ९५, या अनुज्ञप्तीचे अनुज्ञप्तीधारक श्री. मोहन जीवा सोलंकी यांचे नाव कमी करुन अनुज्ञप्तीधारक यांचे कौटुंबीक स्नेही नोकरनामधारक श्री. महेश हरिराम गावडे व श्री. बाबुराव नागोजी अमृसकर यांचे नावे वर्ग करणे बाबत विनंती केली आहे. तरी सदर प्रकरणात कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप असल्यास त्यांनी ही जाहिरात नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन (७) दिवसांचे आत मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर, राज्य उत्पादन शुल्क भवन, दुसरा मजला प्लॉट नं. १४५०, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई- ०१ यांच्याशी संपर्क साधावा. प्रस्तुत प्रकरणी जर वरील मुदतीत याबाबत कोणाचा लेखी आक्षेप आला नाही. तर सदर अनुज्ञप्तीमध्ये श्री. महेश हरिराम गावडे व श्री. बाबुराव नागोजी अमृसकर यांचे नावे समाविष्ट करण्यात येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी".

सही/ -
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर करीता

PUBLIC NOTICE

It is hereby notified that **Mr. Rajendra Kumar Shivnath Pal, residing at Dr. Vinay Smruti Row House No. 4, Ramedi, Vasai (W), Taluka Vasai, District Palghar, Pin code 401201,** has agreed to purchase the property as described inthe schedule below from:

1.Dr. Taufique Mushtaque Shaikh
2.Dr. Gulshan Taufique Shaikh

Both residing at Flat No. 003, Lilian CHS. Ltd., Lake Garden Complex, Papdi Road, Opposite Papdi Lake Garden Complex, Vasai (W), Taluka Vasai, District Palghar, Pin code 401207.

The agreement was executed via a Memorandum of Understanding (MOU) dated 11-10-2024.

Property Details:

Index No. - 2, Vasai-1, 11170/2010 **old Survey no.** 58B, **CTS no.** 371, **Hissa No.** 1 **Property:** (Shaikh Villa) Row House No. 2, with a super built-up area of1550 sq. ft and an open land area of 485sq. ft, located on the ground and first upper floor. **Land Area:** 100.37 square meters, situated in the complex known as ARHAM ROW HOUSES at Village Malonde, Taluka Vasai, District Palghar, within the limits of Vasai-Virar City Municipal Corporation (VVCMC), Jurisdiction of Sub-Registrar - Vasai.

Any person claiming an interest in the said property or any part thereof, whetherby way of sale, gift, lease, inheritance, exchange, mortgage, charge, lien, trust, possession, easement, attachment, or otherwise, is hereby required to notify the undersigned at my office within 15 days from the date of this notice. Failure to do so will result in the completion of the sale without regard to such claims, andany such claims will be deemed waived.

Buyer: Mr. Rajendra Kumar Shivnath Pal
Sellers:
1. Dr. Taufique Mushtaque Shaikh,
2. Dr. Gulshan Taufique Shaikh **Sd/-**
Date: 10.11.2024 **Adv. M. Biswas**
Esplanade Court Library,1st Floor,
Next to BMC Building, Mumbai-400001

मध्य रेल्वे
साहित्य प्रापण

निविदा सूचना क्र.सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२४६०४५/२०२४निविदा क्र.: ८५२४६०४५ **बाब तपशिल:** निर्देशानुसार अधिकृत मान्यतेचा प्रकार असलेल्या बोगीसाठी १६०केएन एअर स्प्रिंग असेंब्लीचा एक प्रशिक्षक संच. आरडीएसओ एसटीआर क्र.आरडीएसओ/सीजी/एस/२३००२, रेव्ह-निल किंवा नवीनतम, पुरवठ्याची व्याप्ती आरडीएसओ एसटीआर क्र.आरडीएसओ/सीजी/एस/२३००२, रेव्ह-निल च्या खंड ४.१ नुसार असेल. **प्रमाण:** ३० सेट. **उघडण्याची अंतिम तारीख:** ०२.१२.२०२४ **निविदा मूल्ये:** १७६८५३४४.४० निविदेचा संपूर्ण तपशील मध्य रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे आणि संपूर्ण कागदपत्रे वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील. 538

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

'लिज्जत' संस्थेची सुस्थितीमधील वाहने विकणे आहे

१) **टाटा SFC.407/31 क्र. MH-04-FU-0698 - मॉडेल २०१२**
संपर्क : गौतम कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मीरा ४०११०४, जि. ठाणे. गौतम कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मीरा ४०११०४, जि. ठाणे.
२) **इनोव्हा (7 Seater) क्र. MH-12-HV-0546 - मॉडेल २०१२**
संपर्क : जिजामाता निवास, नांदेड रोड, तुळजापुरे नगर, लातूर- ४१३५१२
इच्छुक पार्टीने स्वतःच्या ऑफर बंद पाकिटासह प्रत्यक्ष भेटावे.

- संपर्क : ९२२१०५३८२५
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
(खादी आणि ग्रामोद्योग आयोग द्वारा मान्य)
Website : lijjat.com — Email : enquiry@lijjat.com

CSB Bank
Trusted Heritage Smart Future

खालील तपशिलांसह बँकेच्या लॉकर ग्राहकांनी त्यांना सूचना बजावूनही लॉकरचे भाडे भरलेले नाही. सदर प्रकाशन ग्राहकांना ताबडतोब शाखेशी संपर्क साधण्यासाठी आणि लॉकर भाड्याची थकबाकी सदर प्रकाशनाच्या ९० दिवसांच्या आत भरण्याकरिता सूचित करण्यासाठी आहे, तदूनंतर बँक लॉकर कराराच्या अटींनुसार कोणतीही सूचना/माहिती न देता लॉकर उघडण्यासाठी आणि लॉकरमधील सामग्रीचा व्यवहार करण्यासाठी पुढे जाईल आणि ग्राहक त्याच्या सर्व खर्चासाठी आणि परिणामांसाठी जबाबदार असेल.

अ.क्र.	शाखा	लॉकर क्र.	ग्राहकाचे नाव	लॉकर भाड्याची थकबाकी
१	चेंबूर-मुंबई	१६०	प्रेमनाथ शर्मा / नेहा प्रेमनाथ शर्मा	१२५००
२	चेंबूर-मुंबई	६९	व्ही के पूजारी / कुमुदा व्ही पूजारी	१५०००
३	चेंबूर-मुंबई	१५२	ॲग्नेस आर. लुईस	१२५००

ठिकाण : मुंबई
दिनांक : १०.११.२०२४
सीएसबी बँक

देश विदेश

हावडाजवळ रेल्वे घसरली

■ हावडा

पश्चिम बंगालमधील हावडाजवळ झालेल्या रेल्वे अपघातात सिकंदराबाद-शालिमार एक्स्प्रेसचे ३ डबे रुळावरून घसरल्याने अपघात झाला . सुदैवाने यात कोणीही जखमी वा मृत झालेले नाही. रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, आज पहाटे साडेपाच वाजता कोलकात्यापासून ४० किमी अंतरावर असलेल्या नालपूर स्थानकाजवळ हा अपघात झाला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, २२८५० सिकंदराबाद शालीमार एक्सप्रेस आठवड्यातून एकदा धावते. आज पहाटे खरगपूर विभागातील नालपूर स्थानकावरून ट्रेन जात असताना डबे रुळावरून घसरले.

कर्नाटकात सरकारी कार्यालयात गुटखा, तंबाखू खाण्यावर बंदी

■ बंगळुरू

कर्नाटक राज्यातील सरकारी कार्यालयात सिगारेट ओढणे, गुटखा खाणे किंवा तंबाखूजन्य पदार्थ वापरणे यावर बंदी घालण्यात आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हा आदेश जारी केला आहे. याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये फलक लावण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

यापुढे सरकारी कार्यालयात कुणी कर्मचारी तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करताना आढळल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.या संदर्भातील एक पत्रक कर्नाटक सरकारकडून जारी केले आहे. कार्मिक आणि प्रशासकीय सुधारणा विभागाने जारी केलेल्या आदेशात असे स्पष्टपणे लिहिले आहे की, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या हितासाठी तसेच सार्वजनिक आणि सरकारी कर्मचाऱ्यांचे धूम्रपानापासून संरक्षण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

परदेशी पर्यटकांना यापुढे कॅनडाचा दहा वर्षांचा व्हिसा मिळणार नाही

■ टोरंटो

कॅनडा सरकारने आपल्या व्हिसा धोरणामध्ये बदल केला असून यापुढे परदेशी पर्यटकांना दहा वर्षांचा व्हिसा दिला जाणार नाही.देशात वाढत चाललेल्या परदेशी नागरिकांमुळे घरांचा तुटवडा जाणवू लागल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे. नव्या धोरणामुळे पर्यटकांना कोणत्या प्रकारचा व्हिसा द्यावा आणि त्याचा कालावधी किती असावा हे निश्चित करण्याचे अधिकार इमिग्रेशन विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या आधी दिला जाणाऱ्या दहा वर्षांच्या व्हिसावर पर्यटकांना कितीही वेळा देशात ये-जा करण्याची मुभा होती. ती आता बंद झाली आहे.

वायुप्रदुषणामुळे लाहोरमधील सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंध

■ लाहोर

पाकिस्तानच्या पंजाब राज्यातील लाहोरमध्ये हवेची गुणवत्ता धोकादायक स्थिती आल्यामुळे येथील बगीचे, मैदाने, प्राणीसंग्रहालये, पर्यटन व ऐतिहासिक स्थळी नागरिकांच्या प्रवेशावर प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या गर्दीमुळे अधिक प्रदूषण होऊ नये म्हणून ही दक्षता घेण्यात आली आहे.

भारतातील पंजाबमध्ये कापणी नंतर शेत जाळण्याची पद्धत आहे. त्यामुळेही या प्रदूषणात भर पडली आहे. काही दिवसांपूर्वी लाहोरमधील शाळा बंद करण्यात आल्या होत्या. पुढील आठवड्यात शहरातील महाविद्यालयेही बंद करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासासाठी होणारा वाहनांचा वापर कमी होऊन प्रदूषण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. वाहनांची वर्दळ कमी करण्यासाठी आस्थापनांमधील निम्म्या कर्मचारीवर्गाला घरुन काम करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

यासीन मलिकचा मेडिकल रिपोर्ट द्या तिहार प्रशासनाला हायकोर्टाचे निर्देश

■ नवी दिल्ली

काश्मीरमधील फुटीरतावादी नेता यासीन मलिक १ नोव्हेंबरपासून तुरुंगात उपोषण सुरू केले आहे. आपल्याला हृदय आणि मुत्राशयाशी संबंधित विकार असून तुरुंग प्रशासनाकडे योग्य ते औषधोपचार दिले जात नाहीत, अशी तक्रार मलिकने केली आहे. यासंबंधीच्या खटल्यात काल दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली असता न्यायालयाने मलिकचा वैद्यकीय अहवाल सादर करण्याचे निर्देश तुरुंग प्रशासनाला दिले.

बंदी घालण्यात आलेल्या जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट (जेकेएलएफ) या संघटनेचा माजी प्रमुख यासीन मलिक सध्या तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. त्याला दहशतवाद्यांना अर्थपुरवठा केल्याप्रकरणी बेकायदेशीर कृत्य (प्रतिबंधक) कायद्याखाली दाखल गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

झारखंडमध्ये सोरेन यांच्या निकटवर्तियांच्या घरांवर छापेमारी

■ रांची

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे खासगी सल्लागार सुनील श्रीवास्तव आणि त्यांच्याशी संबंधित लोकांच्या घरांवर आज आयकर विभागाने एकाच वेळी छापे टाकले.

आयकर विभागाच्या पथकांनी रांचीमध्ये ७ ठिकाणी तर जमशेटपूरमध्ये नऊ ठिकाणी छापे टाकले. त्यात जमशेटपूरच्या अंजानिया इस्पात कंपनीचा समावेश आहे. श्रीवास्तव यांनी आयकराच्या परताव्यामध्ये लपवाछपवी केली असा संशय आहे. त्यावरून ही छापेमारी करण्यात आली. २६ ऑक्टोबरला हवालाच्या माध्यमातून पैशाचा व्यवहार होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर आयकर विभागाच्या पथकांनी रांची, जमशेटपूर, गिरिडीह आणि कोलकाता येथे धाडसत्र राबविले होते.

नेदरलँडमध्ये इस्त्रायलच्या फुटबॉलप्रेमीवर हल्ला

■ हम्स्टर्डम

इस्त्रायल-लॅबनॉन संघर्षामुळे आता जगभर इस्लामी कट्टरपंथी इस्त्रायलच्या नागरिकांना टार्गेट करॉत आहेत. नेदरलँडमध्ये फुटबॉल सामना पाहण्यासाठी गेलेल्या इस्त्रायली नागरिकांवर हल्ला करण्यात आला. यात १२ जण जखमी झाले आहेत तर या हल्ल्याप्रकरणी ६५ जणांना अटक करण्यात आली आहे.

इस्त्रायलचे सुरक्षामंत्री इमामार बिन जाविर यांनी एक्सवर पोस्ट केली. त्यात म्हटले की, नेदरलँडच्या जोहान क्रु हक स्टेडियमवर एक फुटबॉल सामना होता काही फुटबॉलप्रेमी स्टेडियमवर गेलो होते. त्यावेळी पॅलिस्टाईन समर्थकांनी स्टेडियममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांना त्यांना रोखले पण सामना संपल्यानंतर रात्री पॅलिस्टाइन समर्थकांनी यहुदींचा शोध घेऊन त्यांच्यावर हल्ले केल त्यात १२ जण जखमी झालो आहेत.

नेपाळी पंतप्रधान चीनचा दौरा करणार

■ काठमांडू

नेपाळचे पंतप्रधान के.पी.शर्मा ओली पुढील महिन्यात चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. वास्तविक नेपाळमध्ये जो नवा पंतप्रधान सत्तेवर येतो तो प्रथम भारताचा दौरा करतो. परंतु ओली यांनी पंतप्रधान झाल्यापासून सतत भारतविरोधी भूमिका घेतली त्यामुळे ते पंतप्रधान बनून चार महिने उलटले तरी भारताने त्यांना भारत दौऱ्यासाठी निमंत्रण दिले नाही.

नेपाळी प्रसारमाध्यमांच्या माहितीनुसार चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी ओलीना चीनचा दौरा करण्यासाठी निमंत्रण दिले होते. ५ नोव्हेंबरला चीनी राजदुताने नेपाळचे परराष्ट्र सचिव लामसाल यांची भेट घेऊन नेपाळच्या पंतप्रधानाना २ ते ६ डिसेंबर या कालावधीत चीनमध्ये येण्याचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार के.पी.शर्मा ओली पुढील महिन्यात चीनला जाणार आहेत.

युवा सराफ व्यावसायिक बेपत्ता १२ दिवसांनंतरही थांगपत्ता नाही

■ नाशिक

नाशिक-पुणे महामार्गावरील शिंदे गाव येथील २७ वर्षीय सराफ व्यावसायिक सुशांत ज्ञानेश्वर नागरे हे बेपत्ता झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.त्यांचे गेल्या १२ दिवस रहस्यमय बेपत्ता होणे हा परिसरात चर्चेचा विषय बनला आहे. पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली असली, तरी अद्याप कोणताही ठोस सुगावा लागलेला नाही. यामुळे कुटुंबीयांसह परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सुशांतचा शोध घेण्याची मागणी होत आहे.

नाशिक परिसरात खळबळ

२७ ऑक्टोबर रोजी सुशांत आपल्या वडिलांसोबत जाखोरी येथील शेतावर गेले होते. तिथे काही वेळ घालवल्यानंतर सुशांत हे पाणी आणि खाण्याचे आणतो असे सांगून आपल्या ॲक्टिवावरून निघून गेले आणि त्यानंतर ते परतलेच नाहीत. काही वेळाने वडिलांनी फोन केला असता, सुशांतने मी गावातच आहे, येतोय असे सांगितले आणि फोन बंद केला. हे त्यांचे शेवटचे बोलणे ठरले.त्यानंतर कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. दुसऱ्या दिवशी सुशांतची दुचाकी चांदवड बस स्थानकाजवळ बेवारस अवस्थेत आढळून आली. यामुळे कुटुंबीयांची चिंता आणखीनच वाढली. पोलिसांनाही या घटनेची माहिती देण्यात आली.

परिचय सेवा मंडळाचा ५२ वा श्री सद्‌गुरू साईबाबा उत्सव सोहळा

■ मुंबई

द्वारकामाई, लालबागचा राजा सोसायटी, श्री गणेश नगर, लालबाग येथील परिचय सेवा मंडळाच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री सत्यनारायणाची महापूजा व श्री साईबाबांचा भंडारा (महाप्रसाद) सोमवार ११ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वा. ते ३ वा. आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून या उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन परिचय सेवा मंडळातर्फे मंगेश मधुकर बोरकर, साईराज विद्याधर काणेकर, दिपक गोविंद नरे आणि इतर मंडळाचे सभासद यांनी केले आहे.

महिला सक्षमीकरणाची ऐशी की तैशी ९७ जागी एकही महिला उमेदवार नाही

■ पुणे

जाहीर सभांमधून दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे नेते महिला सक्षमीकरणावर बोलताना आपण गेली अनेक वर्षे ऐकत आलो आहोत. मात्र राजकारणात महिलांच्या स्थितीमध्ये फारसा फरक पडलेला दिसत नाही. विधानसभा निवडणुकीत राज्यात ९७ मतदारसंघ असे आहेत की जिथून एकही महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नाही.

राज्यात विधानसभेचे २८८ मतदारसंघ आहेत. त्यांपैकी ९७ म्हणजेच एक तृतियांश मतदारसंघात एकही महिला उमेदवार नाही. उमेदवारांची एकूण संख्या ४ हजार १२० आहे. त्यात महिलांची संख्या आहे अवघी ३५९ आहे. हे प्रमाण पुरूष उमेदवारांच्या तुलनेत १० टक्क्यांहून कमी आहे. दोन प्रमुख आघाड्यांनी मिळून फक्त ५५ महिलांना उमेदवारी दिली. त्यापैकी महाविकास आघाडीने २९ तर महायुतीने २६ महिलांना उमेदवारी दिली आहे. उर्वरित ४२ महिला उमेदवार या बहुतांश अपक्ष आणि छोट्या पक्षांतील आहेत. लोकसभेत आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के म्हणजे सदस्य संख्येच्या १ तृतियांश आरक्षण देण्याचा कायदा गेल्या वर्षी संसदेत मंजूर झाला आहे.

उल्हासनगरात पोलिसांची ड्रोनद्वारे गस्त

■ उल्हासनगर

सध्याच्या विधानसभा निवडणूक काळात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी उल्हासनगर शहरात ड्रोन कॅमे-याची नजर ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशानुसार आणि पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगरात ड्रोन गस्तीसह नाकाबंदी तपासणी मोहीम राबविण्यात आली. बिर्ला गेट,शहाड जकात नाका आणि शहाड ब्रिज परिसरात वरीष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली.

या विशेष मोहिमेत ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करून परिसरातील सर्व हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले. ड्रोनच्या माध्यमातून दूरवरून देखील पोलिसांना संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवता येणार आहे. आतापर्यंत वाहनांमध्ये लपवून ठेवलेली अवैध दारू,बेकायदेशीर रोकड आणि इतर बेकायदेशीर वस्तू शोधण्यात ड्रोन कॅमेऱ्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.या मोहिमेमुळे शहरातील नागरिकांमध्ये पोलीस दलाबद्दल विश्वास वाढला आहे. अनेकांनी पोलिसांच्या या ड्रोन गस्तीचे समर्थन केले आहे.

पुण्याचा ताम्हिणी घाट बनला देशातील विक्रमी पावसाचा प्रदेश

■ पुणे

भारतातील सर्वाधिक पाऊस मेघालय राज्यातील चेरापुंजी अन् मोसमीराम या गावात पडतो, अशी नोंद सर्वत्र आहे.याठिकाणी दरवर्षी जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत या भागात सरासरी ९ हजार मिलिमीटर पाऊस पडतो. मात्र आता या चेरापुंजीलाही मागे टाकणारा पाऊस पुणे अन् रायगड जिल्ह्यांना जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात पडतो, अशी माहिती समोर आली आहे. पुण्यातील चार ज्येष्ठ हवामान तज्ज्ञांनी संशोधन करून 'रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायटी' या जगातील प्रतिष्ठित शोधपत्रिकेत ही नवी माहिती दिली आहे.

ताम्हिणी घाटाच्या विक्रमी पावसाची नोंद देशाने घेतली नाही. विशेष म्हणजे मेघालय राज्यातील मोसमीराम या गावाने चेरापुंजीलाही मागे टाकत पहिला क्रमांक मिळवल्याची नवी नोंद आहे.मात्र,यंदाच्या २०२४ च्या मान्सूनने ताम्हिणी घाटाचे नाव चर्चेत आले. कारण तेथे यंदा जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत सुमारे १० हजार मिलिमीटर पाऊस पडला. ताम्हिणी येथे दरवर्षीची सरासरी कमीत कमी ५ ते ६ हजार मिलिमीटर इतकी आहे, मात्र प्रत्यक्षात तेथे ९ हजार ते ९५०० मिलिमीटर पाऊस पडतो. यंदा २०२४ मध्ये जून ते सप्टेंबर या काळात येथे तब्बल ९ हजार ८०० मिमी म्हणजे १० हजार मिलिमीटरच्या पाऊस झाला आहे.

खानापूर आणि सिद्दापूर तालुक्यात टस्कर हत्तींच्या कळपाचा मुक्काम

■ बेळगाव

पश्चिम घाटात असलेल्या खानापूर आणि कारवार जिल्ह्यातील सिद्दापूर तालुक्यात गेल्या ४ दिवसांपासून टस्कर हत्तींच्या कळपाने मुक्काम केला आहे. हे हत्ती दिवसा आणि रात्री भात, ऊस पिकाचे मोठे नुकसान करत आहेत. त्यामुळे या हत्तींचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

कारवार जिल्ह्यातील सिद्दापूर तालुक्यातील शेलुरी गावात हत्तीने सुपारी, भात पिकाचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे. बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील जळगे परिसरात गेल्या चार दिवसांपासून हे हत्ती शेतातील कापलेल्या भात पिकाचा फडशा पाडत आहेत. तसेच काही शेतकऱ्यांच्या मळणीसाठी तयार केलेल्या गंजी उद्‌ध्वस्त केल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.या हत्तीच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे शेतात जाणे बंद झाले आहे. वनविभाग केवळ हत्तींचा माग काढणे आणि पंचनामा करण्यातच व्यस्त असल्याचा आरोप शेतकरीवर्ग करीत आहे.

धुळ्यात चोरट्यांनी रस्त्यांवरील वीज खांब, पथदिवे केले लंपास

■ धुळे

सोलापूर महामार्गावरील गरताड शिवारातील काही गावांमध्ये चोरट्यांनी चक्क रस्त्यातील विजेचे खांब आणि पथदिवे लंपास केल्याची घटना घडली आहे.विशेष म्हणजे या अज्ञात चोरट्यांनी रस्त्याच्या कडेला लावलेले दिशादर्शक फलकही चोरून नेले आहेत.

याप्रकरणी महावितरणचे अधिकारी पन्ना हुसेन शेख यांनी धुळे तालुका पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. गरताड शिवारातील तरवाडे, जूनवणे,विंचूर,बोरविहीर या गावांतून अज्ञात चोरट्यांनी वीज खांब,पथदिवे आणि दिशादर्शक फलक लंपास केले आहेत.२५ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत चाळीसगाव चौफुली ते गरताड शिवारातील चार गावांमध्ये ही चोरीची घटना घडली आहे.

१७ नोव्हेंबरपासून ४ दिवस होणार 'उल्कावर्षाव'

■ अमरावती

नोव्हेंबर महिन्यात एक महत्वाची खगोलीय घटना घडणार आहे. येत्या १७ ते २० नोव्हेंबरमध्ये सिंह तारकासमुहातून मोठ्या प्रमाणात उल्कावर्षाव होणार आहे. पहाटेच्या सुमारास याची शक्यता जास्त राहील. त्यामुळे आकाशात चार दिवस आतषबाजी पहायला मिळणार आहे. या उल्कावर्षावाची तीव्रता आणि निश्चित वेळ मात्र खात्रीने सांगता येत नाही.

या उल्का वर्षावाला 'लिओनिड्स' हे नाव आहे. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असतांना एकाद्यावेळी क्षणार्धात एकादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपणास दिसते या घटनेस तारा तुटणे असे म्हणतात. ही एक खगोलीय घटना आहे. एखाद्यावेळी उल्का आपल्याला पडताना दिसते, या संदर्भात लोकांच्या अंधश्रद्धा आहे. अशा अंधश्रद्धेला खगोलशास्त्रात कुठेही आधार नाही. सिंह तारकासमुहातून होणारा हा उल्कावर्षाव 'टेम्पलटटल' या धूमकेतूच्या अवशेषामुळे होतो व हा धूमकेतू ३३ वर्षांनी सुर्याला भेट देतो. तरी सर्व खगोलप्रेमींनी उल्का वर्षावाचे विलोभनीय दृष्य पाहावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

परशुराम घाटात अपघातामुळे वाहतूक कोंडी

■ रत्नागिरी

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात ट्रकचा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र अपघातामुळे परशुराम घाटातील वाहतूक ठप्प झाली होती. तीन ते चार किलोमीटरपर्यंत गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यानंतर एकेरी वाहतूक चालू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

राजश्री लॉटरी Government Lottery
Goa State Lotteries
सर्वांचे आहे स्वप्ने, सिटी मध्ये घर हो आपले!
राजश्री 500 MONTHLY LOTTERY
जिंका ₹1,25,00,000 (₹1.25 करोड)
तिकीट ₹500/-
Book Now At: bookmyrajshree.com

पालवी उशिरा! मोहर लांबला यंदा हापूस हंगाम विलंबाने

■ सिंधुदुर्ग

नोव्हेंबरचा पहिला आठवडा उलटला तरी हापूस कलमांना मोहर येण्याऐवजी सध्या पालवी फुटण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही पालवी पूर्ण तयार होत नाही, तोपर्यंत झाडांना मोहर येणार नाही. आता या झाडांना मोहर येण्यास डिसेंबरच्या पहिल्या आठवड्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे यावर्षीच्या हापूस हंगामाला विलंब होणार आहे.

दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात झाडांना पालवी येऊन नोव्हेंबरमध्ये मोहर येतो. परंतु यावर्षी एक महिना उशिराने सर्व प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे हापूस हंगाम एक महिना लांबणार आहे. दरवर्षी जानेवारीअखेर किवा फेब्रुवारीपासून हंगामाला प्रारंभ होऊन मार्च मध्यानंतर हंगाम एन भरात येतो. परंतु यावर्षी हंगामाचे सर्वच गणित बिघडणार आहे. देवगड, मालवण, वेंगुर्ला या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हापूस लागवड केली जाते.पाऊस लांबल्यामुळे केवळ ३० टक्के आंबा कलमांना पालवी आली आहे, तर उर्वरित ७० टक्के झाडांना पालवी आणि अजिबात मोहर दिसत नाही. पुढील काही दिवसांत थंडी पडली तरच चांगला मोहर येऊ शकेल.

जालन्यातील राजुरी स्टील कंपनीच्या मालकाला जीवे मारण्याची धमकी

■ जालना

शहरातील राजुरी स्टील कंपनीचे मालक कैलास लोया यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. दोन लाख रुपये द्या,अन्यथा कंपनी बंद करू आणि जिवे मारू, अशी धमकी कैलास लोया यांना त्यांच्या कंपनीच्या सुपरवायझरच्या मोबाईलवरून दिली आहे. या धमकीप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात नागेवाडी येथील संतोष गायकवाड व राम जाधव या दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

मागील काही महिन्यांपासून जालना शहरातील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या मालकांना, खंडण्या मागण्याचे प्रकार वाढले आहेत. खंडणी न दिल्यास थेट हल्ले केले जात आहेत. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली आहे. कैलास लोया यांचीही या वसाहतीत राजुरी स्टील कंपनी आहे. नागेवाडी शिवारात तुमच्या शेठला दोन लाख रुपये देण्यास सांगा, नाही तर मजुरांना मारहाण करून तुम्हाला जिवे मारून टाकू, अशी धमकी लोया यांचे सुपरवायझर नंदकिशोर कुरधनेच्या मोबाईलवरून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र दिवाळी भव्यतम सोडत
MAHARASHTRA DIWALI BUMPER DRAW
शेवटचे 2 दिवस
जिंका फक्त 5 अंकावर
पहिले सामायिक बक्षीस ₹ 1 करोड
दुसरे बक्षीस ₹ 25 लाख ₹5 लाखाची 5 बक्षीसे
तिकीट ₹200/-
सोडत दिनांक 12-11-2024
तिकीटांची विक्री जोरात सुरु
प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

नवाकाळ शब्दकोडे-१०७१



आडवे शब्द –

२. चैत्र महिना ५. संथ गतीने, हळू ८. संध्याकाळ ११. नवरा, कुटुंबप्रमुख १२. आवेश, त्वेष १४. दमयंतीचा पती १५. भार, ओझे १६. देशावर प्रेम करणारा १७. निरुपाय, नाइलाज १९. असंस्कृत, टोणपा, ठोंब्या २०. दिवसाचा आठवा भाग २१. अपशकुन होणे २३. सत्ताविसावे नक्षत्र २५. मोठी जाड सुई २७. साह्य २९. जलद ३०. तुकडी, पलटण ३१. कौशल्य ३३. ओला गोळा ३५. चिकार, पुष्कळ ३६. शुष्कता ३७. व्यास ऋषींची आई ३९. पेरणी ४२. खाई, गर्ता ४३. खिळा, खुंटी ४५. डेरा, मोठ्या आकाराचा तंबू ४८. पदवी, किताब ५०. गावातील रहिवासी ५२. अभ्यंगस्नानाच्या वेळी वापरली जाणारी उटी, उटणे ५३. रावण ५६. निधन होणे ५८. दह्याचे पाचक पेय ५९. अतिशय अल्प, सूक्ष्म ६०. जाळ, पावक, अग्नी ६१. हस्तलिखित ६२. कीर्तन ६५. भक्षण ६६. एक हलका धातू, कल्हई करताना हा वापरतात ६८. राजासारखा देखणा ६९. खाष्ट, अतिशय कृपण ७१. साबुदाण्याची खीर ७२. फळाची अपेक्षा ठेवून केलेले कर्म ७४. विठ्ठलाचा पुजारी ७६. वाटप करणारा ७९. स्पष्टीकरण, उलगडा ८१. सरकारशी झालेले करार, दस्तऐवज ८२. सुकामेव्यातील एक अगोड पदार्थ ८४. वेदना, यंत्रातील बटन ८५. घोसाळे ८६. इंद्राचे शस्त्र ८७. जागरूक ८८. हंस ८९. सुभाषचंद्र बोस यांची उपाधी ९२. भेषज, दवा ९५. पलायन ९६. आपला राष्ट्रीय पक्षी ९७. कालमर्यादा नसलेले ९८अ. मारुतीची खरी उपासना, व्यायाम १०१. पंधरवडा १०२. उजेड १०४. बायको १०५. नियम १०६. सलगी १०७. कळस १०८. पुत्र १०९. निगरगट्ट ११०. गुरुद्वारातले अन्नछत्र

उभे शब्द –

१. जाहीरपणे, राजरोस २. पुष्परस गोळा करणारा कीटक ३. शेकोटी ४. त्रास देणे ६. जंगल ७. काळाचा महिमा ८. तिखट-मिठाचा रवा ९. निर्लज्ज १०. हिंसाचार १३. अधीन, अंकित १५. डोंगरातून आरपार जाणारा रस्ता १६. अंग, शरीर १७. असमर्थ, असहाय १८. मूर्खपणे बोलणे २०. ओंकार २१. मोठेपणा २२. व्यभिचार २४. आयुर्वेदिक औषधाची गोळी २६. अत्यंत वेगात २८. दडपण ३१. पराभव ३२. मासा, मीन ३४. मिश्रण, खिचडी ३६. तांबडे कमळ ३७. बंदी ३८. सोललेल्या उसाचा तुकडा ४०. एक त्वचारोग ४१. कच खाणे ४२. राडा, चिखल ४४. रोगप्रतिबंधक इंजेक्शन ४६. गवई ४७. वित्त ४९. विश्वासघातकी ५०. गायन ५१. दया ५४. बछडा ५५. अचंबा ५७. बुब्बुळाचा आजार ५८. लकेर ६२. विरोध ६३. चामडे ६४. राजाज्ञा, फर्मान ६५. खडूस ६७. उथळ, बालिश ६८. स्वतःच्या मर्जीने ६९. गुडघ्याच्या खालचे हाड ७०. नावाडी ७३. सौम्य स्वभावाचा, नेमस्त ७४. दुराचरणी, दुर्वर्तनी ७५. मवाली, समाजकंटक ७७. आस्था ७८. कपाळ फुटणे ८०. उत्तर महाराष्ट्रातला झणझणीत गरम मसाला ८२. कोप, गैरमर्जी ८३. राग, संताप ९०. चांदणी ९१. समूह ९२. नांगर ९३. कामाचा डोंगर ९४. मेंदी ९५. वर्तुळाचा घेर, बाह्यरेषा ९८. खळगा ९९. माणसे १००. अखंड १०१. मांडी १०२. परंपरा, वहिवाट १०३. शंभर १०५. शासन, शिक्षा

•

नवाकाळ कोडे क्रमांक १०७० चे उत्तर

आडवे शब्द : २. अकांडतांडव ६. पक्षपात ९. अंगारकी १२. निकुंज १३. रसभरित १४. थापेबाज १६. गफलत १८. रजक ५०. तयार २३. कायदेशीर २८. नजराणा ३०. गवगवा ३५. परचक्र ३७. आदेश ३८. सलोखा ३९. दसरा ४०. मास ४१. सव ४२. सरकार ४४. ठाम ४५. ठराविक ४७. तारक ४९. ममता ५०. लीप ५२. तळ ५३. वावर ५५. मच्छरदाणी ५८. रामठ ६०. कलह ६२. वारुणी ६४. खोट ६५. चंगळ ६८. अनावश्यक ७०. भरवसा ७३. पेहराव ७४. वायस ७५. लाभ ७७. शाखा ७८. सचकार ७९. ताठा ८०. कवक ८१. पतकर ८३. वार ८५. मूक ८६. कर्ण ८८. उरू ८९. बंगला ९१. नामी ९३. अनुकंपा ९४. गिधाड ९५. झाले गेले ९६. उपसागर ९७. नस १००. उडीद १०१. रक्त १०२. हटके १०३. बदसल्ला

उभे शब्द : १. अनिकेत २. अजगर ३. डबलबी ४. डर ५. वसवा ६. परिणय ७. क्षत ८. तथा ९. अंबा १०. गाजर ११. कीचक १५. पेण १७. काशी १९. जमा २१. यारी २२. मौज २३. काणा २४. देवदेवता २५. रग २६. भृंग २७. और २८. नक्र २९. राक्षसविवाह ३१. वजीर ३२. वासरमणी ३३. आखाड ३४. बदफैली ३५. पराठा ३६. चक्र ३७. आस ४०. मारा ४२. सकच्छ ४३. कामदा ४५. ठळक ४६. कव ४८. रमणी ५१. पराग ५४. रवा ५६. रघूनायक ५७. लोट ५९. मळभ ६१. लठ्ठ ६३. रुद्रावतार ६४. खोकला ६५. चंद्रशाला ६६. शिव ६७. शहर ६८. अवा ६९. वसवणे ७१. रजत ७२. सासर ७३. पेकाट ७६. भरकटलेला ८१. पर्ण ८२. कष्ट ८३. वारू ८४. अगड ८६. कमी ८७. अनुरक्त ८८. उपानह ८९. बंधारा ९०. बालेकिल्ला ९१. नाट ९२. श्वापद ९३. अगर ९६. उडी ९८. सट ९९. धुंद

मेष
मीन
वृषभ
कुंभ
मिथुन
मकर
कर्क
धनु
सिंह
वृश्चिक
तुला
कन्या

साप्ताहिक राशिभविष्य

रविवार १० नोव्हेंबर २०२४ ते शनिवार १६ नोव्हेंबर २०२४

संजय मनोहर

मेष :

कौटुंबिक समस्या सोडवता येतील. नोकरी व्यवसायात प्रगतीसाठी घरातल्यांचे सहकार्य लाभेल. विभक्त झालेल्यांना समेटाची चांगली संधी मिळेल. नियोजित शुभकार्य रहित होतील अथवा लांबणीवर पडतील. भावंडांचे, नातेवाईकांचे उत्तम सहकार्य लाभेल. घरातील कार्यात संततीचा हातभार लागेल. महिलांनी जास्तीची जबाबदारी अंगावर ओढवून घेऊ नये. तरुणांना नात्यातील समस्यांमधून मार्ग काढण्यात सफलता मिळेल.

नवीन नोकरीसाठी अर्ज करण्यास अनुकूलता आहे. करिअरमधील प्रगती समाधान देणारी राहील. वरिष्ठ अधिकारी तसेच सहकाऱ्यांबरोबरचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न यश देईल. व्यवसायातील भागीदारांबरोबरचे प्रश्न सुटतील. व्यवसायात वाढ होईल. सराफी, कारागिरी या क्षेत्रात काम करणाऱ्यांना उत्तम आर्थिक फायदे मिळतील.

लागणे, खरचटणे, भाजणे यापासून सावध असावे. प्रवासात तब्येतीची हेळसांड होणार नाही, याची काळजी घ्यावी. धार्मिक कार्यात मन गुंतवू शकाल.

शुभ दिनांक : १०, १२, १५.

वृषभ :

कोणतेही महत्त्वाचे निर्णय विशेषतः आर्थिक बाबतीतले जोखमीचे निर्णय घेण्याआधी काळजी घेणे इष्ट राहील. नात्यामधील समस्या निरुत्साही करत राहतील, तरीही त्यातून मार्ग काढू शकाल. आपले मत व्यक्त करताना समोरच्या व्यक्तीची मानसिकता ओळखणे गरजेचे राहील. संततीने केलेल्या उद्योगातून अडचणीत येण्याची शक्यता आहे. महिलांनी चौकशीअंती खरेदी करावी. तरुणांनी मिळालेल्या संधीचा फायदा करून घ्यावा.

नोकरीतील वातावरण आनंददायी राहील. वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी लीलया पेलू शकाल. व्यवसाय विस्तारासाठी अनुकूल अवधी आहे. व्यवसायातील बदलाने आर्थिक फायदा वाढेल. कला, प्रसिद्धी, साहित्यलेखन या क्षेत्रात काम करणाऱ्यांना उत्तम पैसा मिळेल.

प्रवासापूर्वी वाटणारी भीती प्रवासामुळे नाहीशी होईल. मधुमेह अथवा रक्तदाब असणाऱ्यांनी दुर्लक्ष न करता काळजी घ्यावी. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्याल.

शुभ दिनांक : ११, १३, १६.

मिथुन :

अडचणीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागेल. कठोर बोलणे टाळा. बोलण्यामुळे नातेसंबंध बिघडणार नाहीत, याची काळजी घ्यावी. खर्च अधिक होईल. संततीचे उत्तम चालल्याचे समाधान राहील. महिलांकडे पैशाचा ओघ वाढता राहील. तरुणांना नाते सांभाळण्याच्या दृष्टिकोनातून विचार करणे भाग पडेल.

नोकरदारांना अनपेक्षित समस्यांचा सामना करावा लागेल. वैयक्तिक आश्वासने देताना ती पूर्ण करता येतील याची खात्री करावी. व्यावसायिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी कर्जाची उपलब्धता होईल. कायदेशीर बाबींवर अधिक खर्च होणार नाही, याची काळजी घ्यावी. बोलणे, वाणीशी संबंधातील व्यावसायिकांना आर्थिक लाभ होतील.

कान, नाक, घशाचे आरोग्य जपावे. वाहने जपून चालवावीत. आध्यात्मिक प्रगती होईल. मनातील संकल्पना प्रत्यक्षात उतरवू शकाल.

शुभ दिनांक : १०, १२, १६.

कर्क :

जोडीदाराशी नातेसंबंध उत्तम राहतील. ज्येष्ठांना थोडे मुत्सद्दीपणाने उत्तर द्यावे लागेल. घरात खेळीमेळीचे वातावरण राहील. गरजेनुसार इतरांशी वागणे, बोलणे ठेवावे. सहज म्हणून केलेल्या व्यवहारातून उत्तम फायदा होईल. संततीच्या अडून राहिलेल्या गोष्टींना मार्ग मिळेल. महिलांनी अवास्तव, अविचारी खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तरुणांनी आपल्यातील त्रुटी ओळखून वागणे, बोलणे बदलावे.

नोकरीत सहकाऱ्यांच्या कृतीमुळे हातात पडणाऱ्या गोष्टी दूर ढकलल्या जातील. व्यावसायिक प्रगतीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होईल. नवीन उत्पादन बाजारपेठेत आणू शकाल. शेती, शेतीजन्य व्यवसाय करणाऱ्यांना आर्थिक लाभ होतील.

अती खाण्याने पोट बिघडणार नाही, याची काळजी घ्यावी. प्रवासादरम्यान कामाचे दडपण आणि ताण जाणवत राहील. जप, पारायणाने मनातील अशांतता दूर करू शकाल.

शुभ दिनांक : ११, १३, १५.

सिंह :

नातेसंबंधात सलोखा राखू शकाल. यशप्राप्तीसाठी घरातील व्यक्तींचे सहकार्य लाभेल. बहीण-भावंडांमधील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न यश देईल. संततीने सांगितलेल्या गोष्टी न ऐकल्यामुळे काही प्रमाणात वादविवाद निर्माण होतील. महिलांना कमी श्रमात अधिक लाभ होतील. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील.

नोकरीत सहकाऱ्यांवर अवलंबून राहू नये. कामाचा उरक वाढवावा लागेल. व्यवसायात दीर्घकालीन लाभाच्या दृष्टीने काही गुंतवणूक करायची योजना असल्यास त्यासाठी हा चांगला अवधी असेल. अपूर्ण माहितीवर घेतलेले निर्णय नुकसान करतील. वैद्यकीय व्यावसायिक, औषधनिर्मिती य क्षेत्रात काम करणाऱ्यांना आर्थिक लाभ पदरी पडतील.

जनेंद्रियांशी संबंधित आजारांकडे दुर्लक्ष करू नये. दूरच्या प्रवासाचे बेत आखू शकाल. धार्मिक वातावरणात मन प्रसन्न होईल. सत्संग लाभेल.

शुभ दिनांक : १०, १३, १६.

कन्या :

कुटुंबात किरकोळ खटके उडाले तरी परिस्थिती व्यवस्थित हाताळू शकाल. खर्चाचे गणित जमवू न शकल्याने वाढत्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी कर्जाचा आधार घ्यावा लागेल. स्थावर गुंतवणुकीतून उत्तम फायदा मिळेल. कोणत्याही कामाची सुरुवात करताना विचारपूर्वक निर्णय घ्यावेत. संततीशी अति प्रेमाने, मायेने वागणे वेडेपणाचे ठरेल. महिलांनी केलेल्या कार्याचे कौतुक होईल. तरुण सोपविलेल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडू शकतील.

नोकरीत सहकारी तसेच अधिकाऱ्यांबरोबर संयमाने वागणे योग्य राहील. व्यवसायात केलेले नवनवीन बदल आर्थिक फायदा वाढवतील. उधारीवसूलीचे प्रयत्न यश देतील. सौंदर्यप्रसाधने, शिलाईकाम, बुटिक, कमर्शियल आर्ट, डेकोरेशन या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आर्थिक फायदा होईल.

श्वसनासंबंधी आजार होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. प्रवासाचा आनंद घ्याल. वाचन, श्रवण मनास शांतता देईल.

शुभ दिनांक : ११, १५, १६.

तूळ :

गैरसमज दूर झाल्यामुळे कौटुंबिक वातावरण शांत राहील. स्वतःतील चुकीच्या गोष्टींची जाणीव होईल. गैरसमजामुळे अडचणीत येऊ शकाल. संततीस हिताच्या दोन गोष्टी सांगणे आवश्यक राहील. महिलांना कुटुंबीयांसोबत प्रवासाचा आनंद मिळेल. तरुणांनी आलेल्या संधीचा फायदा करून घ्यावा. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील.

नोकरीत विशिष्ट कामासाठी तुमची वर्णी लागेल. वरिष्ठांशी सल्लामसलत केल्याने मनातील गोंधळ कमी करू शकाल. समव्यावसायिकांशी स्पर्धा करणे टाळावे. व्यवसायात घाईगर्दीत घेतलेला निर्णय समस्या निर्माण करणारा ठरू शकतो. कागद, छपाई, शालोपयोगी वस्तू, स्टेशनरी या व्यावसायिकांना उत्तम लाभ होतील.

मज्जासंस्थेसंबंधी आजारांपासून जपावे. वाहने चालवताना काळजी घ्यावी. देवदर्शनानिमित्त प्रवास घडेल.

शुभ दिनांक : १०, ११, १५.

वृश्चिक :

इच्छित साध्य झाल्याचे समाधान मिळेल. जुन्या नातेसंबंधास नवीन दृष्टिकोन देणाऱ्या घटना घडतील. अपेक्षित यशप्राप्तीमुळे कौटुंबिक सुखात भर पडेल. ज्येष्ठांशी मतभेद झाले तरी तेवढ्यापुरते असतील. संततीकडून कौतुकास्पद कामगिरी पार पडेल. महिलांना आवश्यक गोष्टीच्या पूर्ततेसाठी पैशाची उपलब्धता झाल्याचे समाधान राहील. तरुणांनी स्वयंशिस्तीत राहणे आवश्यक ठरेल.

नोकरीत कुठलाही निर्णय घेताना वरिष्ठांच्या नाराजीस कारणीभूत होणार नाही, याची काळजी घ्यावी. बदली, बढतीचे प्रयत्न यश देतील. व्यवसायात नीट माहिती घेणे, चौकशी करणे फायद्याचे राहील. व्यवसायात बोलण्यातील चुका फायद्याचे प्रमाण कमी करू शकतात. फळे, फुले, भाजी विक्रेते व्यापारी यांना आर्थिक लाभ होईल.

आरोग्याच्या बाबतीत गोष्टी आजच्या उद्यावर ढकलू नये. प्रवासात वेळेचे, पैशाचे नियोजन समाधान निर्माण करेल. धार्मिक कार्यात सहभाग घ्याल.

शुभ दिनांक : ११, १५, १६.

धनु :

घरातील जुन्या नव्या पिढीमध्ये योग्य प्रकारे समन्वय साधू शकाल. घरातील आनंद, उत्साह टिकवून ठेवण्यात यशस्वी व्हाल. घरमालक, भाडेकरू यांचे वाद चिघळतील. पैशाच्या गुंतवणुकीचे घेतलेले निर्णय योग्य ठरतील. संततीच्या अवास्तव खर्चास बंधन घालणे योग्य राहील. महिलांना केलेल्या बचतीतून आवश्यक गोष्टींची खरेदी करता येईल. तरुणांना आळशी वृत्ती नुकसानकारक ठरेल.

नोकरीत वरिष्ठांना खूश ठेवल्याने अधिक सोयीसुविधा मिळतील. सहकाऱ्यांशी संबंध सुधारतील. व्यावसायिकांची बँकेची, शासकीय अडलेली कामे मार्गी लागतील. व्यवसायातील भागीदाराच्या अडचणी दूर करण्यास तुमचे सहकार्य उपयोगी पडेल. चुना, खाणकाम, लोखंड, कोळसा या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आर्थिक फायदा मिळेल.

अति खाण्याने पोट बिघडणार नाही, याची काळजी घ्यावी. प्रवास दगदगीचे परंतु कार्यसाधक होतील. जप, तप, पारायणाचे अनुष्ठाने संकल्प पूर्णत्वास जातील.

शुभ दिनांक : ११, १३, १६.

मकर :

घरातील जुन्या नव्या पिढीमध्ये आदराचे वातावरण राहील. अविचारी खर्च होणार नाही, याची काळजी घ्यावी. घडत असलेल्या प्रसंगामुळे शहाणपण आल्याचे जाणवेल. आपल्या निर्णयावर ठाम असावे. संततीबाबतीत मनात असलेली भीती फोल ठरेल. महिलांना काल्पनिक चिंतांचा त्रास होईल. तरुणांना आकर्षक संधी उपलब्ध होतील.

नोकरीत वरिष्ठांमुळे अडचणी दूर होतील. काहींना कमी श्रमात अधिक लाभ होईल. व्यवसायात व्यापाराच्या दृष्टीने केलेले प्रवास उत्तम यश देतील. शासकीय, बँक, कर्ज, भांडवलाची उपलब्धता या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील. चहा, कॉफी, सुकामेवा, फळभाजी विक्रेते, फुले, बागायती या क्षेत्रात उत्तम पैसा मिळेल. काहीना अचानक धनलाभाचे योग.

सर्दी, डोकेदुखी यापासून सावध असावे, प्रवासात इतरांना आपण अडसर बनणार नाही, याची काळजी घ्यावी. वाचन, श्रवणाचा आनंद मानसिक ताण घालविण्यास मदत करेल.

शुभ दिनांक : १०, १२, १५.

कुंभ :

नात्यातील व्यक्तीच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न कष्ट वाढवेल. मिळणारा पैसा योग्य ठिकाणी गुंतवल्याचे समाधान मिळेल. संततीच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयांवरून घरात वादविवाद निर्माण होईल. महिलांनी आपल्या परिस्थितीचा समोरच्याकडून फायदा घेतला जाणार नाही, याची काळजी घ्यावी. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना अवघड मुलाखतीत घवघवीत यश मिळेल.

नोकरीत केलेल्या चुकीमुळे कामाचा ताणतणाव वाढेल. वरिष्ठांशी सल्लामसलत करून घेतलेले निर्णय फायदा देतील. व्यवसायात अपूर्ण माहितीवर घेतलेले निर्णय नुकसान करतील. भागीदाराच्या अडचणींमुळे अडचणीत याल. व्यवसायात ओळखीच्या व्यक्तीकडून फायदा संभवतो. हॉटेल, लॉजिंग, बोर्डिंग, खाद्यपदार्थ या क्षेत्रातील व्यक्तींना आर्थिक लाभ होईल.

मधुमेहींनी पथ्यपाणी सांभाळावे. प्रवास आनंद वाढविणारे ठरतील. धार्मिक कार्यातील तुमचा सहभाग मोलाचा ठरेल.

शुभ दिनांक : ११, १३, १५.

मीन :

नातेवाईकांमध्ये केलेल्या कामाचे कौतुक होईल. मन प्रसन्न करणाऱ्या गोष्टी घडतील. जमीन, मालमत्तेचे अडचणीचे प्रश्न सोडविण्यात यश मिळेल. बरेच दिवसांपासून राहून गेलेल्या गोष्टी, वेळेच्या पैशाच्याअभावी अडलेली कामे मार्गी लागतील. संततीशी थोडे जशास तसे वागणे आवश्यक राहील. महिलांना अडचणी दूर करण्यास वेळ, पैसा मिळेल. तरुणांना नवीन ओळखी वाढवाव्याशा वाटतील, त्यातून फायदा मिळेल.

नोकरीत न पेलणारी जबाबदारी यशस्वीरीत्या पेलू शकाल. वरिष्ठ आपुलकीने वागवतील. व्यवसायात हाताखालील व्यक्तींशी पैशाचे व्यवहार करताना हिशोबी वृत्ती ठेवणे आवश्यक ठरेल. व्यवसायातील तुमचे ठोकताळे तंतोतंत खरे ठरल्याने उत्तम फायदा पदरात पडेल. वाहन खरेदी-विक्री, पर्यटन, वाहतूक कमिशन एजंट, या क्षेत्रात काम करणाऱ्यांना उत्तम पैसा मिळेल.

बद्धकोष्ठतेपासून सावध असावे. सत्संगाचा सहवास लाभेल. प्रवास सुखकारक ठरतील. मित्रांचे सल्ले नुकसानकारक राहतील.

शुभ दिनांक : १०, १३, १६.

* * *

नवाकाळ
• पुणे | रविवार १० नोव्हेंबर, २०२४ • पान -८

मध्य रेल्वेच्या दोन्ही मार्गांवर आज मेगाब्लॉक

मुंबई - उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती, सिग्नल यंत्रणेतील तांत्रिक कामासाठी उद्या रविवार १० नोव्हेंबर रोजी मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेचा माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्ग, तर हार्बर मार्गावरील सीएसएमटी-चुनाभट्टी/वांद्रे अप आणि डाऊन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेच्या माहीम ते गोरेगाव अप आणि डाऊन हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात आला आहे. मेगाब्लॉक काळात सीएसएमटीहून सकाळी १० वाजून २५ मिनिट ते दुपारी २ वाजून ४५ मिनिटांपर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकादरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. या गाड्या निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्याच्या पलीकडे असलेल्या जलद गाड्या मुलुंड स्थानकावर डाऊन फास्ट मार्गावरून पुन्हा वळवण्यात येतील. सकाळी १० वाजून ५० मिनिटे ते दुपारी ३ वाजेपर्यंत ठाण्याहून सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. त्याचप्रमाणे हार्बर मार्गावर अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सीएसएमटी ते चुनाभट्टी/वादे दरम्यान सकाळी ११ वाजून १० मिनिटे ते दुपारी ४ वाजून ४० मिनिटांपर्यंत ब्लॉक असेल.

थोडक्यात...

शायना एन.सी. यांच्या प्रचारात अभिनेता गोविंदा सहभागी

मुंबई - मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार शायना एन.सी. यांच्या प्रचारात अभिनेता गोविंदा सहभागी झाले. यावेळी त्यांनी मुंबादेवी मंदिरात जाऊन दर्शन घेतले व शायना एन.सी. यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रसारमाध्यमांसमोर गोविंदा म्हणाले की, मी शायना एनसी यांच्या विजयासाठी मुंबादेवीचे दर्शन घेतले असून त्यांना शुभेच्छा देतो. त्या या मतदारसंघातून विजयी होतील. शायना एन.सी. यांच्या मतदार संघात काल एका कार्यकर्ता मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. डॉ. श्रीकांत शिंदे, किरण रिजुजु व अभिनेता गोविंदा यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

मनिषा वायकर यांनी पैसे, साड्या वाटल्या

मनसे,ठाकरे गटाचा आरोप

मुंबई - जोगेश्वरी पूर्व येथील भूतबंगला येथे जोगेश्वरी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार मनिषा वायकर यांच्या हळदी-कुंकू कायक्रमात महिलांना पैसे आणि साड्या वाटप करण्यामुळे एकच गोंधळ झाला. या कार्यक्रमाची माहिती मिळताच मनसे आणि उबाठा गटाचे पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मनसेचे या मतदारसंघातील उमेदवार भालचंद्र अंबुरे, उबाठाचे अमित पेडणेकर यांनी मेघवाडी पोलीस ठाण्यात तसेच निवडणूक आयोगाकडे या प्रकरणी मनिषा वायकर यांच्याविरोधात आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार दाखल केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळेंच्या महालक्ष्मी जगदंबा संस्थेच्या अडचणीत वाढ

■ नागपूर

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष असलेल्या महालक्ष्मी जगदंबा संस्थेला राज्य सरकारने पाच एकर भूखंड दिला आहे.मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात लोकायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीची गंभीर दखल घेत लोकायुक्त यांनी महसूल विभाग व नागपूर जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल मागवला आहे.

या संस्थेला जागा दिल्याची ॲड.किसन चौधरी यांनी तक्रार दाखल केली आहे. सर्व नियम धाब्यावर बसवून राज्य शासनाने भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या संस्थेला भूखंड दिला. याच्या सखोल चौकशीचे आदेश लोकायुक्त यांनी द्यावेत.या भूखंडाचा ताबा राज्य शासनाने परत घ्यावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. लोकायुक्त व्ही.एम. कानडे यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेतली व ३ जानेवारी २०२५ पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव व नागपूर जिल्हाधिकारी यांना दिले.

दरम्यान, राज्य सरकारने या संस्थेला नर्सिंग, कनिष्ठ महाविद्यालय, विज्ञान-कला-वाणिज्य महाविद्यालय आणि कौशल्य विकास केंद्र बांधण्यासाठी या जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाने त्यास मंजुरीही दिली आहे.

सोलापूर जिल्हा बँक घोटाळा मोहिते-पाटलांसह ३५ नेते अडचणीत

■ सोलापूर

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गैरव्यवहारप्रकरणी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, शिंदे बंधू या मातब्बर नेत्यांसह ३५ जणांवर २३८ कोटी ४४ लाख रुपयांच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात आली. मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना जबाबदार धरण्यात आले आहे.

याप्रकरणी बार्शीचे आमदार राजेंद्र राऊतांनी सहकार विभाग आणि रिझर्व्ह बँकेकडे तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने सहकारी विभागाने ३ सदस्य चौकशी समिती नेमली होती. त्या समितीने केलेल्या चौकशीत तक्रारींमध्ये तथ्य आढळले होते. राज्य सरकारकडून त्यावर कारवाई होत नसल्याने राजेंद्र राऊतांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांच्याकडे चौकशी अधिकारी किशोर तोष्णीवाल यांनी अहवाल सादर केला.

बारामतीतून लढणारच नव्हतो

■ पुणे

मी बारामतीतून लढणारच नव्हतो, तर शिरुर-हवेलीतून उभे राहण्यासाठी माझी इच्छा होती, असे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आज सांगितले.अजित पवार यांच्या या खुलाशामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

अजित पवारांचे वक्तव्य

पुणे जिल्ह्यातील लोणी-काळभोरला अजित पवारांची शिरूर-हवेली मतदारसंघाचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रचारासाठी अजित पवार यांची सभा झाली. यावेळी अजित पवार म्हणाले की, बारामतीतून मी उभा रहाणार नव्हतो. शिरुर- हवेलीतून उभा राहण्याची इच्छा होती, तशी चाचपणी करायला लावली होती. शिरुर, पुरंदर, सिन्नर विधानसभा मतदारसंघातूनही मला लढण्याची संधी होती.

ते पुढे म्हणाले की, यावेळी आम्ही तगडे उमेदवार दिले आहेत. पण याचा अर्थ असा होत नाही की, ज्यांना आधी उमेदवारी मिळाली ते तगडे नव्हते. पण पुढच्या वेळी मतदारसंघाची

फेररचना होणार आहे. महायुतीमध्ये समन्वय ठेवण्याचे काम एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, मी आणि आमच्या घटक पक्षांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी खोटे नरेटिव्ह पसरवले होते. त्याचा महायुतीला मोठा फटका बसला होता. पण आता आपल्याला पुन्हा महायुतीचे सरकार राज्यामध्ये आणायचे आहे.

काँग्रेसने मोदींना पाच प्रश्न विचारले

■ नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या राज्याच्या दौऱ्यावर असून आपल्या प्रचारसभांमध्ये त्यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी पंतप्रधानांना पाच प्रश्न विचारले आहेत. आपल्या एक्स समाजमाध्यमावर त्यांनी हे प्रश्न विचारले असून मोदींच्या अनेक दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

जयराम रमेश यांनी म्हटले आहे की, जातिनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढवण्यासाठी भाजपाने आतापर्यंत काय केले? याबाबत तुमची भूमिका काय आहे. पंतप्रधानांनी अशोक चव्हाणांना जेलमध्ये टाकण्याचे वचन दिले होते, त्याची पूर्तता कधी करणार? भारतीय रेल्वेच्या नांदेड विभागाकडे मोदी सरकारच्या कार्यकाळात दुर्लक्ष का केले. नांदेड विभागाच्या विकासासाठी पंतप्रधानांकडे कोणती योजना आहे? मराठवाड्यातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी कोणत्या योजना आहेत. २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यात जलग्रीड बनवण्यासाठी २० ते २५ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली होती. त्याचे पुढे काय झाले. आजही मराठवाड्यातील ६०० हून अधिक गावे टँकरवर का अवलंबून आहेत? पंतप्रधानांनी काँग्रेसवर टीका करताना या प्रश्नांची उत्तरे द्यावीत अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

भाजपा-मनसे छुपी युती आहे आदित्य ठाकरे यांचे वक्तव्य

■ मुंबई

भाजपा आणि मनसे छुपी युती आहे असे वक्तव्य ठाकरे गटाचे वरळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आदित्य ठाकरे यांनी केले. आज आदित्य ठाकरेंनी वरळी विधानसभा मतदारसंघात प्रचार रॅली काढली होती. यावेळी त्यांनी मतदारसंघातील नागरिकांच्या भेटी घेत, त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

या रॅलीत त्यांच्या सोबत ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर उपस्थित होत्या. तर शरद पवार गट, काँग्रेस आणि आपचे पदाधिकारी, कार्यकर्तेही उपस्थित होते. यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले की, वरळीमध्ये आम्ही केलेले काम बोलेल. वरळीतील जनता आमच्या पाठीशी आहे. मशिदीतून ठाकरे गटासाठी फतवे काढले जातात अशी टीका राज ठाकरे यांनी केली. यावर आदित्य ठाकरे म्हणाले की, आमच्यावर बोलायचे त्यांचे संस्कार आहेत. ते आमचे संस्कार नाही. मनसे पक्षाला निवडणुकीच्या दोन महिने आधी जाग येते. कुठेतरी कोणाबरोबर तरी सेटिंग करतात आणि उभे राहतात आणि परत पाच वर्षे शांत होतात. त्यांच्यावर बोलण्याची गरज नाही. मनसे टाईमपास टोळी आहे हे मी आधीही बोललो आहे. या टाईमपास टोळीने इकडच्या भूमिपुत्रांच्या नोकऱ्या गुजरातला नेल्या अशा भाजपाला लोकसभेला पाठिंबा दिला. मनसे गुजरातच्या भूमिपुत्रांसाठी लढते, महाराष्ट्राच्या नाही. भाजपा आणि मनसे ही छुपी युती आहे. वरळीतून आदित्य ठाकरे, शिंदे गटाकडून मिलिंद देवरा तर मनसेकडून संदीप देशपांडे उभे आहेत.

पन्ना येथील हिऱ्यांच्या विक्रीत मोठी घसरण

■ पन्ना

जागतिक हिरे व्यापारात महत्त्वाचे केंद्र असलेल्या पन्ना येथील हिऱ्यांच्या विक्रीत सलग तीन वर्षे घट होत असून यंदा यात विक्रमी घसरण झाली. त्यामुळे हिऱ्यांच्या किंमतीतही घट झाली असून अनेक हिरे विक्रीविना पडून आहेत. जागतिक पातळीवरील युद्धजन्य स्थिती व प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेल्या हिऱ्यांच्या वापरात झालेली वाढ यामुळे विक्रीत घट झाली. पन्नामधील हिऱ्यांची विक्री करण्यात अडचण येत असून सरकारतर्फे चालवण्यात येणाऱ्या हिरे कार्यालयातही अनेक हिरे विक्रीविना पडून आहेत. या कार्यालयाने या वर्षी केलेल्या लिलावानंतरही ६४ हिरे पडून असून गेल्या वर्षी १३९ तर त्या आधी ६८ हिरे विकले गेले नव्हते. या लिलावातून हिरे खरेदी करुन नंतर त्यांची खुल्या बाजारात विक्री करत असतात.

लोढांकडून दापोली व इतर ठिकाणी ३ हजार कोटींची जमिनींची खरेदी

■ मुंबई

बांधकाम उद्योगातील अग्रणी असलेल्या अभिनंदन लोढा ग्रुपने मोठी झेप घेतली आहे. देशातील काही भागात ३ हजार कोटी रुपयांच्या ३५२ एकर जमिनीची खरेदी केली आहे. अमृतसर, वृंदावन, वाराणसी, शिमला, नागपूर, दापोली आणि मुंबई जवळच्या खोपोली इथे या जमिनी घेण्यात आल्या आहेत.

पुढच्या वर्षीच्या सुरुवातीला हे ३ हजार कोटी रुपये बांधकाम व्यवसायात गुंतवले जाणार आहेत. लोढांचे ७०० एकरवरील प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहेत. राज्यातील आंजर्ले, दापोली, नेरळ आणि अलीबाग, गोवा व अयोध्येत येथे प्रकल्प सुरू आहेत. पुढच्या महिन्यात आंजर्ले आणि नेरळमधील ५० लाख वर्ग फुटाच्या प्रकल्पाची विक्री किमान २ हजार ग्राहकांना केली जाणार आहे. दापोली व अलीबागमध्येही काही प्रकल्पांची विक्री करण्यात येणार असून अयोध्या व गोव्यातील बांधकाम प्रकल्पांमधील विक्रीही सुरु होणार आहे.

वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडला सावरकरांचे नाव देण्याची मागणी

सोशल मीडियावर भाजपाची जाहिरातबाजी

■ मुंबई

ऐन विधानसभा निवडणूक रणधुमाळीत वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडला वीर सावरकरांचे नाव द्यावे, अशी मागणी पुढे आली आहे. भाजपने यासंदर्भात सोशल मीडियावर जाहिरातबाजी करत काँग्रेसला डिवचले आहे. वीर सावरकरांचे नाव देण्याची मागणी केल्याने भाजप हा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सावरकरांच्या नावाचा वापर करत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. प्रखर राष्ट्रवादी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याला नमन करणारा देवाभाऊ!, महापुरुषांच्या आदर्शाचे स्मरण ठेवण्यासाठी हवी महायुती! अशी जाहिरातबाजी भाजपने सोशल मीडियावर केली आहे.वास्तविक वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, लता मंगेशकर, इंदिरा गांधी, उद्योगपती रतन टाटा आदींची नावे देण्याची मागणी विविध राजकीय पक्षांनी केली आहे.

१ कोटी महिलांना लखपती करणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन

■ चंद्रपूर

आगामी काळात राज्यात १ कोटी महिलांना लखपती करणार आहोत. असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. महायुतीचे चंद्रपूर क्षेत्राचे उमेदवार किशोर जोरगेवार यांच्या प्रचारार्थ आज चंद्रपूरमध्ये जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशातील महिला या अर्थव्यवस्थेच्या आणि समाजव्यवस्थेच्या केंद्रस्थानी याव्यात, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक योजना आणल्या. ‘लखपती दीदी’ योजनेचा लाभ लाखो महिलांना मिळाला. आम्ही आगामी काळात राज्यात १ कोटी महिलांना लखपती करणार आहोत.

ते पुढे म्हणाले की, महिलांना एसटीच्या तिकिटात ५० टक्के सवलतीची योजना आणली. त्यानंतर एसटी महामंडळाचे लोक आमच्याकडे आले व त्यांनी एसटी दिवाळखोरीत निघेल, अशी भीती व्यक्त केली. त्यांना आम्ही काळजी न करण्याचा सल्ला दिला. परत महिनाभरापूर्वी तेच लोक आले व काहीही झाले तरी योजना बंद करू नका, अशी गळ घालू लागले. ते म्हणाले की, योजना सुरू झाल्यापासून महिला प्रवासी वाढल्या. तोट्यातील एसटी नफ्यात आली आहे. या योजनेमुळे घरच्या निम्म्या तिकिटात लाडक्या बहिणी कामासाठी प्रवास करू लागल्या.

बीडचा आदर्श उद्ध्वस्त करणाऱ्यांना पराभूत करा! पवारांचा मुंडेंवर हल्लाबोल

■ परळी

बीड जिल्ह्याचा आदर्श उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, अशा व्यक्तीला उद्याच्या निवडणुकीत पराभूत करा, असा हल्लाबोल शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर केला. महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी आज परळीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची सभा पार पडली, राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर शरद पवार यांची ही परळीमध्ये पहिलीच सभा होती.

शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्राला वीज देण्याचे काम या परळीतून होते. अलीकडच्या काळात परळीला काय झाले आहे ते माहीत नाही. परळीत गुंडगिरी वाढली आहे. काही लोकांना राजकीय संकटाच्या काळात मदत केली होती. बीड जिल्ह्याने सर्व आमदार निवडून देण्याचे काम मला दिले होते. दुर्दैवाने आता परिस्थिती बदलली. सत्ता आल्यानंतर सत्ता डोक्यात जाऊ द्यायची नसते. मात्र, काहींच्या डोक्यात फार लवकर सत्ता गेली. लोकांना त्रास देणे हे कुठेतरी थांबले पाहिजे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरी थांबावी, बीड जिल्ह्यातील शेतीचे पाण्याचे प्रश्न सुटावेत, तरुणाच्या हाताला काम मिळावे, यासाठी तुमची शक्ती त्यांच्या पाठीशी उभी करा. पक्ष संकटात आहे, अनेक अडचणी आहेत.

कोल्हापूरमध्ये रात्री फिरणाऱ्या आठ फूट उंच महिलेची दहशत

■ कोल्हापूर

कोल्हापूरच्या आपटे नगर, कळंबा येथील साने गुरुजी वसाहत परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून लोकांच्या मनात एका आठ फूट बुरखाधारी महिलेची दहशत पसरली आहे. ही बुरखाधारी महिला रात्री फिरत राहते . तिच्या हातात, चाकू, कोयता अशी हत्यारे असतात असे अनेक जण सांगत होते. त्यामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये घबराट पसरली आहे. सुरुवातीला या अफवा आहेत असे बोलले जात होते. गुरुवारी आपटेनगर परिसरात रस्त्यावर फिरणाऱ्या एका तरुणाला ही महिला नजरेस पडली. त्याने आपल्या मोबाईल फोनवर तिचे व्हिडिओ चित्रण करण्याचा प्रयत्न केला असता त्या महिलेने तरुणाच्या अंगावर धावून जात त्याच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला आणि रस्त्यावर आपटून फोडून टाकला.

केजमध्ये तरुणाला कट्ट्यासह अटक

■ बीड

बीड जिल्ह्यातील केजमध्ये पोलिसांनी एका युवकाला गावठी कट्टा व काडतुसांसह पाठलाग करुन ताब्यात घेतले. केजमधील जुबेर मुश्ताक फोरखी याच्याकडे बेकायदेशीर गावठी कट्टा असून त्याद्वारे तो दहशत माजवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस त्याच्या चौकशीसाठी आले असता तो पळून जाऊ लागला. त्यानंतर पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन त्याला पकडले. त्याच्याकडून गावठी कट्टा, मॅगझीन व जिवंत काडतुसे जप्त केली.

सीआरपीएफ अधिकाऱ्यांचा ‘रेशन मनी’ भत्ता बंद

■ नवी दिल्ली

सीआरपीएफ अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दल हे देशातील सर्वात मोठे केंद्रीय निमलष्करी दल समजले जाते. या दलाच्या ग्राउंड कमांडरपासून कमांडंटपर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या रेशन मनी भत्त्यात कपात करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशानंतर सीआरपीएफमध्ये ड्युटी बटालियनव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांचा रेशन भत्ता बंद करण्यात आला आहे. हा भत्ता बंद झाल्याने अधिकाऱ्यांमध्ये निराशेची भावना निर्माण झाली आहे.

सीआरपीएफच्या ग्राऊंड कमांडर म्हणजेच सहाय्यक कमांडटपासून कमांडटपर्यंतच्या अधिकाऱ्यांचा रेशन मनी भत्ता बंद करण्यात आला आहे. सीआरपीएफमध्ये आता केवळ ड्युटी बटालियनला हा भत्ता बंद देण्यात येणार आहे. यामुळे या अधिकाऱ्यांचे सरासरी ४ हजार रुपयांचे नुकसान होणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने पोलिसांच्या ३ डिव्हिजनमध्येदेखील अशाच प्रकारचे आदेश काही दिवसांपूर्वी जारी केले आहेत. तर सीआरपीएफ महासंचालकांनी शुक्रवारी हे आदेश जारी केले.

या अधिकाऱ्यांना १ नोव्हेंबरपासून हा भत्ता दिला जाणार नाही. चार वर्षांपूर्वी सीआरपीएफच्या ९ रँकवर तैनात असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना डिटॅचमेंट अलाऊन्स देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी हे कर्मचारी रेशन मनीसाठी पात्र असतील तर त्यांना हा भत्तादेखील दिला जाणार असल्याचे आदेश काढले होते. यापूर्वी कोणत्याही संस्थेत आणि कुठेही नियुक्ती केल्यास रेशन भत्ता दिला जात होता. पण आता ड्युटी बटालियनमधून इतरत्र नियुक्ती झाल्यास अधिकाऱ्यांना रेशनचे पैसे मिळणार नाहीत.

DEAR
GOVERNMENT LOTTERY

डियर लॉटरी द्वारा झाले मालामाल
जिंकले 1 करोड रुपये

डियर लॉटरीचे पहिले बक्षीस काळबादेवी मुंबई, महाराष्ट्र येथे जिंकले

भाग्यवान तिकीट विक्रेता बक्षीस रक्कम
रु. 5 लाख
प्रजापती लॉटरी, विठ्ठल वाडी, काळबादेवी, मुंबई, महाराष्ट्र

मेवाड एजन्सी,
काळबादेवी, मुंबई, महाराष्ट्र

नागालँड राज्य डियर लॉटरी - महानदी गुरुवार साप्ताहिक लॉटरी च्या 7 नोव्हेंबर 2024 (दुपारी 1:00 वाजता, ड्रॉ क्रमांक 84th) रोजी झालेल्या सोडती मधील पहिले बक्षीस रु. 1 कोटी चे विजेता तिकीट काळबादेवी, मुंबई, महाराष्ट्र येथे विकले गेले. विजेत्या तिकिटाचा क्र. 96E-07147 आहे. भाग्यवान तिकीट विक्रेता प्रजापती लॉटरी, विठ्ठल वाडी, काळबादेवी, मुंबई, महाराष्ट्र येथील आहे. मेसर्स एम अँण्ड सी प्रॉपर्टी डेव्हलपमेंट प्रा. लि. चे श्री. राजेश मदान जी यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

dearlotteries | Dear Lotteries